रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३१८
www.ramprahar.com

◆ शनिवार, ६ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मराठा समाजाला ओबीसींसारख्याच आठ योजनांचा लाभ



**मुंबई :** मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ओबीसी समाजाला मिळणाऱ्या विविध योजनांच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल आठ कल्याणकारी योजना सुरू करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता. त्यानंतर आता शैक्षणिक सवलतींसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा मोठा आणि ऐतिहासिक असा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील विद्यार्थी, युवक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे. उदाहरणार्थ दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. सध्या ही योजना ओबीसी विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. तसेच मराठा समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहनचालक आणि वाहक प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

## अंतरंग

मोक्का लागलेल्या आरोपीला पिस्तुलासह अटक/२
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबईत वृक्षारोपण/६
अफगाणिस्तानविरुद्ध तिसऱ्या स्थानी सुदर्शन?/८

# राज्य सरकारचा मोठा निर्णय!

## शासकीय जमीन हस्तांतरण, पुनर्विकासाचे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास आणि वापरात बदलमंजुरी हे राज्य शासनाचे अधिकार आता थेट जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त स्तरावर विकेंद्रित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार हा बदल झाला असून, यामुळे प्रसाशन गतिमान होईलच आणि जनतेचा पैसा, वेळ आणि प्रवास वाचेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून शासनाचे परिपत्रकही काढण्यात आले आहे.

शासकीय जमिनींच्या विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त एफएसआय किंवा टीडीआर वापरासाठी आतापर्यंत मंत्रालयाची मान्यता आवश्यक होती. आता हे सर्व अधिकार विकेंद्रित करून जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त स्तरावर देण्यात आले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार हा बदल करण्यात आला असून शासनाने परिपत्रकही जारी केले आहे. प्रशासकीय गतिमानता वाढवण्यासाठी २८ डिसेंबर २०१५ व १७ सप्टेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचना रद्द करण्यात आल्या आहेत. नव्या निर्णयानुसार १० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकरणांचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना तर २० लाखांपर्यंतच्या प्रकरणांचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत.



> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिमान प्रशासनाच्या संकल्पनेतून हा निर्णय घेण्यात आला आहे. क्षेत्रीय पातळीवरील अधिकाऱ्यांना अधिकार दिल्यामुळे नागरिकांना आणि विकासकांना मंत्रालयाच्या फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. यामुळे विकासकामांना मोठी गती मिळेल.
>
> **–चंद्रशेखर बावनकुळे**, महसूलमंत्री

यामुळे गृहनिर्माण संस्थांचे पुनर्विकास प्रस्ताव, शाळा–रुग्णालयांसाठी जमीन हस्तांतरण आणि औद्योगिक वापरातील बदलाचे प्रस्ताव स्थानिक पातळीवरच मार्गी लागतील. नझूल जमिनींना पूर्वलक्षी प्रभाव लागू होणार नाही. नजराणा आणि नियमानुसार शुल्क वसुली करण्यात येईल. विसंगती असल्यास मूळ अटी लागू राहतील. या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरच फायलींचा वेगाने निपटारा होणार असून जनतेचा पैसा, वेळ आणि प्रवास वाचणार आहे. रखडलेले पुनर्विकास प्रकल्प मार्गी लागून नागरी विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## जागतिक पर्यावरण दिनी पनवेलच्या कल्पतरू सोसायटी परिसरात वृक्षारोपण

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पनवेल शहरात विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच दिनानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या एक पेड़ माँ के नाम या आवाहनाला प्रतिसाद देत कोशिश फाउंडेशनच्या वतीने पनवेलमधील कल्पतरू सोसायटी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेचा मुख्य शुभारंभ भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.



यावेळी त्यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि वसुंधरेला हिरवेगार करण्यासाठी प्रत्येकाने या अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. या वेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, श्वेता बहिरा, माजी नगरसेवक सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, प्रीतम धनाजी म्हात्रे, आदेश ठाकूर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांचा तडकाफडकी राजीनामा

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद पुंडलिक म्हात्रे यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. त्यांनी आपले अधिकृत राजीनामा पत्र महापौर नितीन पाटील आणि शेतकरी कामगार पक्षाचे गटनेते केतन भगत यांच्याकडे सुपूर्द केले. या राजीनाम्याला कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची पार्श्वभूमी असल्याचे बोलले जात आहे.

राजकीय वर्तुळातील चर्चेनुसार विधान परिषद निवडणुकीत झालेल्या अंतर्गत घडामोडींमुळे म्हात्रे यांचा स्वाभिमान दुखावला गेला व त्यातूनच त्यांनी हा राजीनामा देण्याचे पाऊल उचलले. या नाट्यमय घडामोडींनंतर अनिकेत तटकरे बिनविरोध निवडून आले. अरविंद म्हात्रे यांनी पत्रात वैयक्तिक कारणास्तव विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा स्वेच्छेने सादर केल्याचे नमूद केले. या राजीनाम्यानंतर महापौर नितीन पाटील महापालिका सचिवांशी कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींवर चर्चा करून अंतिम निर्णय घेणार आहेत. तांत्रिक प्रक्रियेनुसार हा राजीनामा पुढील मंजुरीसाठी कोकण आयुक्तांकडे पाठवला जाऊ शकतो.

म्हात्रे यांच्या निर्णयामुळे शेतकरी कामगार पक्षात अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. म्हात्रे यांनी राजीनामा मागे घ्यावा यासाठी पक्षाकडून प्रयत्न सुरू असले तरी या घडामोडींमुळे पनवेलच्या राजकारणाला कोणती नवीन कलाटणी मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि करिअर मार्गदर्शन शिबिर

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शैक्षणिक उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून पनवेल शहरात एका अत्यंत प्रेरणादायी आणि भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जाणीव एक सामाजिक संस्था आणि अभिनव युवक मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आणि करिअर मार्गदर्शन शिबिर अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाले. गुरुवारी (दि. ४) दांडेकर हॉस्पिटलजवळील आगरी समाज हॉल येथे हा सोहळा पार पडला.



या सोहळ्याच्या माध्यमातून नुकत्याच जाहीर झालेल्या दहावी–बारावी परीक्षेच्या निकालात आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर घवघवीत यश संपादन करणाऱ्या पनवेल शहरातील शेकडो गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सोहळ्याचे मुख्य आकर्षण असलेले महाराष्ट्रातील नामवंत व्याख्याते प्राध्यापक विजय नवले यांचे करिअर मार्गदर्शन शिबिर उपस्थित विद्यार्थी आणि पालकांसाठी अत्यंत दिशादर्शक ठरले.

प्राध्यापक विजय नवले यांनी आपल्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण शैलीत विद्यार्थ्यांना भविष्यातील विविध शैक्षणिक वाटा, करिअरच्या नवनवीन आणि आधुनिक संधी तसेच आवडीच्या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेले योग्य नियोजन यावर बहुमोल मार्गदर्शन केले. **(पान २ वर..)**

## रामशेठ ठाकूर कॉलेजच्या अर्शची आयआयएम रायपूरमध्ये निवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**



खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य व लेखाशास्त्र विभागातील विद्यार्थी अर्श याची देशातील प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, रायपूर येथे निवड झाली आहे. पहिल्याच प्रयत्नात अत्यंत स्पर्धात्मक प्रवेश प्रक्रिया पार करत त्याने हे यश मिळवले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. महाविद्यालयातील वाणिज्य व लेखाशास्त्र विभागाचा विद्यार्थी अर्श याची आयआयएम रायपूर येथे व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. देशभरातील हजारो विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या प्रवेश प्रक्रियेत यश संपादन करून अर्शने गुणवत्ता, चिकाटी आणि परिश्रमाचे उदाहरण सादर केले आहे.

व्यवस्थापन शिक्षणाच्या क्षेत्रात आयआयएम संस्थांना विशेष मानाचे स्थान असून तेथील प्रवेश ही मोठी उपलब्धी मानली जाते. अर्शने आपल्या शैक्षणिक प्रवासात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करताना अभ्यासाबरोबरच विविध उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग नोंदवला. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या महेश्वरी झिरपे यांनी त्याचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वाणिज्य व लेखाशास्त्र विभागाचे प्रमुख विशाल देशमुख, महादेव चव्हाण, राहुल कांबळे, तनुजा सुमन व प्रमोद वाघे यांनीही अर्शचे कौतुक केले. अर्शचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे विभागाने म्हटले आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुण भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य नगरसेवक परेश ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव एस. टी. गडदे यांनी अर्शचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आंबेगावच्या हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्याची निर्घृण हत्या

**मंचर : प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील गोनवडी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्थात आयटीआयच्या मुलांच्या वसतिगृहात शुक्रवारी (दि. ५) पहाटे धक्कादायक घटना घडली. हॉस्टेलच्या टेरेसवर झोपलेल्या विद्यार्थ्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सौरभ संतोष साखरे (२३) असे हत्या झालेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. तो आयटीआय महाविद्यालयातील मुलांच्या हॉस्टेलमध्ये राहत होता. उन्हाळ्यामुळे उकाडा असल्याने सौरभ वसतिगृहाच्या टेरेसवर झोपला होता. त्याच ठिकाणी त्याच्यावर प्राणघातक हल्ला झाला.

## राजिप सदस्याला ५२ लाखांना लुटले

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**



### स्वस्तात सोने देण्याचे आमिष

स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवत रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य अविनाश अनिल नलावडे (३४, सणसवाडी, माणगाव, रायगड) यांना अहिल्यानगर शहराजवळील बुरुडगाव भागात बोलावून घेत दरोडेखोरांनी मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम व दागिने असा एकूण ५२ लाख रुपयांचा ऐवज लुटला. यासंदर्भात अहिल्यानगर तालुका पोलिसांनी १५ ते १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दरोडेखोरांच्या मारहाणीत अविनाश नलावडे यांच्यासह सोनाराम मोतीराम माळी (सराफ व्यावसायिक) व गाडीचा चालक प्रकाश जंगम हे तिघे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुरुवारी सायंकाळी घडलेल्या या घटनेबाबत अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे करीत आहेत.

स्वस्तात सोन्याचे आमिष दाखवून त्याच्या मोहाला बळी पडणाऱ्यांना परजिल्ह्यातील तसेच परराज्यातील व्यावसायिकांना अहिल्यानगर जिल्ह्यात बोलावून घेत मारहाण करून लुटण्याचे अनेक प्रकार यापूर्वीही घडले आहेत. अहिल्यानगर, श्रीगोंदे व कोपरगाव भागात या घटना अधिक प्रमाणात घडल्या आहेत.

### पर्यावरण दिनी एसटीचा निर्धार

## स्थानके व बसेसची दर चार तासांनी स्वच्छता

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व प्रमुख बसस्थानके, एसटी बसेस, चालक–वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहांची आता दर चार तासांनी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने स्वच्छता केली जाणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. ५) मुंबईतील परळ बसस्थानक येथे या राज्यव्यापी स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.




'एसटी'च्या प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, स्वच्छ आणि दर्जेदार करण्यासाठी महामंडळाने हे पाऊल उचलले आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते परळ बसस्थानक येथे या मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी स्वच्छतेसाठी आणलेल्या आधुनिक यंत्रसामुग्रीचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले. यावेळी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीने प्रवास करतात. त्यामुळे त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. ही मोहीम प्रवाशांना एक नवा आणि आनंददायी अनुभव देईल. ही स्वच्छता मोहीम एका दिवसापुरती मर्यादित नसून सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

मोहिमेच्या अंमलबजावणीवर आणि स्वच्छतेच्या दर्जावर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाईल. कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, अशी तंबीही सरनाईक यांनी दिली. पर्यावरण रक्षणाचा संदेश देत या स्वच्छता मोहिमेदरम्यान प्रत्येक बसस्थानकावर गोळा होणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि पिशव्या कचऱ्यात न टाकता संकलित केल्या जाणार आहेत. हे प्लास्टिक पुनर्वापरासाठी पाठविण्यात येणार असून त्यापासून विविध टिकाऊ व उपयुक्त वस्तू तयार करण्यात येतील, अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. प्रत्येक बसस्थानकावरील स्वच्छतेचे नियोजनबद्ध निरीक्षणही केले जाईल.



# ‘जुन्या कपड्यांवरील पुनर्प्रक्रियेमुळे पर्यावरण संवर्धनासह महिलांसाठी रोजगार निर्मिती’



**मुंबई : प्रतिनिधी**

जुन्या कपड्यांवरील पुनर्प्रक्रिया आणि अपसायकलिंग केल्याने पर्यावरण संवर्धनासह महिलांसाठी रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असे प्रतिपादन वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वर्ल्ड ट्रेड सेंटर मध्ये आयोजित कार्यक्रमात त्यांचा व्हिडिओ संदेश प्रदर्शित करण्यात आला.

रिफायबर आणि ओटेररी यांच्या वतीने मुंबईतील वापरानंतर टाकून दिल्या जाणाऱ्या कपड्यांच्या कचऱ्याचे संकलन व अपसायकलिंग करण्यासाठी मुंबईत सुरू करण्यात आलेल्या विशेष मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री सावकारे यांचा संदेश प्रदर्शित करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश वस्त्रकचऱ्याचे संकलन, पुनर्वापर आणि मूल्यवर्धन करून पर्यावरणपूरक व शाश्वत वस्त्रव्यवस्था निर्माण करणे हा आहे. ५ ते १२ जून या कालावधीत मुंबईभर वस्त्र संकलन मोहीम राबविण्यात येणार असून नागरिक, संस्था आणि विविध गटांना वापरलेले कपडे संकलन केंद्रांवर किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी ‘रिफायबर अपसायकल्ड प्रॉडक्ट्स मार्केटप्लेस’चे उद्घाटनही करण्यात आले. टिसरशी संलग्न महिला कारागिरांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात येणार असून, वस्त्रकचऱ्याचे मूल्यवर्धन करत महिलांसाठी रोजगारनिर्मितीस चालना मिळणार आहे. कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग आयुक्त वृंदा देसाई यांनी वस्त्र पुनर्वापर आणि सर्क्युलॅरिटी क्षेत्रातील भारताच्या प्रगतीचा उल्लेख करत घरगुती स्तरावर निर्माण होणाऱ्या वस्त्रकचऱ्याचा अधिक प्रभावी वापर करण्याची गरज व्यक्त केली. सरकार, उद्योग आणि नागरिक यांच्या सहभागातून वस्त्रकचऱ्याचे मौल्यवान संसाधनात रूपांतर करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

टिसरच्या संस्थापक डॉ. मेघा फणसळकर यांनी वस्त्र अपसायकलिंगद्वारे टाकाऊ कापडांपासून उपयुक्त उत्पादने तयार करून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. रिफायबर आणि ओटेररीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज वनवारी यांनी तंत्रज्ञानाधारित प्लॅटफॉर्म आणि संकलन नेटवर्कच्या माध्यमातून वस्त्रकचऱ्याचा पुनर्वापर अधिक सुलभ व प्रभावी करण्याचा प्रयत्न असल्याचे नमूद केले. क्लोदिंग मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (सीएमएआय) चे अध्यक्ष संजय कटारिया यांनी हा उपक्रम कचऱ्याचे संधीत रूपांतर करणारी व्यापक चळवळ असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाला वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री, सीएमएआय चे संतोष कटारिया, यूएनआडीओचे डॉ. पंकज कुमार, लायन्स इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन मनोज बाबूर, ग्रासिम इंडस्ट्रीजचे सूर्या वल्लुरी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. भारतातील वस्त्रोद्योगात सर्क्युलॅरिटी, नवकल्पना आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी सरकार, उद्योग, विकास संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांचे हे प्रभावी उदाहरण असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## पं.स.सदस्या जिज्ञासा कोळींची गव्हाणमधील अंगणवाड्यांसाठी नवीन इमारतींची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

गव्हाण गावातील अंगणवाडी क्रमांक १, २, ३ व ४ यांच्या अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेमुळे या अंगणवाड्यांना जागेसह नवीन इमारती बांधून देण्याची मागणी पनवेल पंचायत समिती सदस्या जिज्ञासा किशोर कोळी यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात आले असून आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनाही त्याची प्रत सादर करण्यात आली आहे.



जिज्ञासा कोळी यांनी निवेदनात म्हंटले आहे की, गव्हाण गावातील अंगणवाडी क्रमांक १, २, ३ व ४ या इमारती अत्यंत नादुरुस्त झाल्या असून कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील लहान विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच अंगणवाडी क्रमांक १ व २ समोरील अनधिकृत बांधकामावर सिडकोने १० जून २०२५ रोजी कारवाई केली होती. त्यानंतर २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निकृष्ट करण्यात आलेल्या बांधकामाचे काही अवशेष अंगणवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिसून आल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम अंगणवाडीच्या पटसंख्येवरही झाल्याचे जिज्ञासा कोळी यांनी निवेदनात केले.

याशिवाय अंगणवाडीलगत असलेल्या अनधिकृत इमारतीवर २५ मे रोजी करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान इमारतीचे काही भाग अंगणवाडीच्या पत्र्यावर पडल्याने पत्रे फुटली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात अंगणवाडीत पावसाचे पाणी गळण्याची शक्यता निर्माण झाली असून विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो.

या पार्श्वभूमीवर सिडकोच्या अभियंत्यांकडून तात्काळ पाहणी करून गव्हाण गावातील अंगणवाडी क्रमांक १, २, ३ व ४ साठी सिडको विकास निधीतून जागेसह नवीन इमारती उभारण्यात याव्यात, अशी मागणी जिज्ञासा कोळी यांनी केली आहे.

दरम्यान, या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा स्थानिक नागरिक आणि पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

## नवी मुंबईत बोगस जन्म दाखल्याचे प्रकार; माजी खासदार किरीट सोमय्यांनी घेतली आयुक्तांची भेट

**नवी मुंबईः बातमीदार**

मुंबईत हजारो बोगस जन्म दाखले मिळून आले आहेत. याप्रकरणी तेथे प्रशासनाकडून कारवाई सुरु झाली आहे. माजी खा. किरीट सोमय्या यांच्याकडून. पुराव्यांसह या तक्रारी करण्यात आल्या होत्या. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी. देखील चौकशीचे आदेश. दिले आहेत. असेच प्रकार नवी मुंबई पालिकेत देखील घडले असल्याचा आरोपकिरीट सोमय्या यांनी केला आहे.

यासाठी गुरुवार रोजी सोमय्या यांनी पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी पालिकेचे अधिकारी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील तसेच नगरसेवक उपस्थित होते. सोमय्या यांनी म्हटले की,महापालिकेच्या तपासणीत जन्म–मृत्यू नोंदणीत कुठलेही संशयास्पद आढळून आल्यास त्यावर तात्काळ कारवाई करावी. जन्म–मृत्यू दाखल्यातील दुरुस्तीसाठी कोणी येत असेल तर त्याची खातरजमा करण्यासाठी मूळ कागदपत्राची पडताळणी करणे गरजेची आहे.

२०१६ साली केंद्र शासनाने जन्म मृत्यू नोंदणी पोर्टल सुरू केले होते. मात्र पालिकेकडून त्या पोर्टलसोबत जोडली गेली नसल्याचे उघड झाले. २०२४ साली पालिकेने या पोर्टलमध्ये नोंद करण्या सुरुवात केल्याची माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी माहिती देताना सांगितले. या ८ वर्षाचा रेकॉर्ड तपासावा अशी मागणी सोमय्यांनी पालिकेडे केली असून १५ दिवसांनी सोमय्या पुन्हा आयुक्तांची भेट घेणार असल्याचे डॉ.पाटील यांनी यावेळी माहिती देताना सांगितले.

## मोक्का लागलेल्या आरोपीस पिस्तुलासह अटक

**पनवेल : वार्ताहर**

सुमारे ३२ कोटी रुपयांच्या एमडी अमलीपदार्थाच्या तस्करीसह मोक्का लागलेला संशयीत आरोपी सहा महिन्यांपासून फरार होता. ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने तळोजा पोलिसांच्या मदतीने त्याला तळोजा येथून अटक केली. अटकेवेळी आरोपीकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियमासह महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसी उर्फ छोटू कमर अहमद अन्सारी (वय २७) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो मूळचा उत्तर प्रदेशातील प्रयागराज जिल्ह्यातील रहिवासी असून सध्या तळोजा फेज–२ येथील साईधाम सोसायटीत भाड्याने राहत होता. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा, भिवंडी घटक–२ मधील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराज माळी यांनी तळोजा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनूसार, मागील वर्षी कोनगाव पोलीस ठाण्यात एमडी अमलीपदार्थ तस्करी प्रकरणात वसी हा फरार आरोपी होता. या प्रकरणात सुमारे ३२ कोटी रुपयांचा एमडी जप्त करण्यात आला होता.

तपासादरम्यान अमलीपदार्थाच्या विक्री व वितरणामध्ये त्याची भूमिका असल्याचे निष्पन्न झाले होते.

## राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते वृक्षलागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रायगड जिल्हा परिषद येथे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि .५) वृक्षारोपण करण्यात आले.

जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी ५ जून रोजी साजरा केला जातो. २०२६च्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निसर्गाचे रक्षण आणि प्रदूषण मुक्तीचा संदेश देण्यात आला. पर्यावरणाचा ढासळता समतोल राखण्यासाठी शासनातर्फे दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जात आहे. त्या अनुषंगाने राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते कुंटेबाग येथील परिसरात नारळ, बांबू, सुपारीच्या रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विशाल तनपुरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, यांच्यासह कृषि विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

गेल्या वर्षी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पावसाळ्यात सुमारे अडीच लाख रोपांची लागवड केली होती. यावर्षीदेखील अशाचप्रकारे मोठ्या संख्येने वृक्षलागवड करण्यात येणार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याची निगा राखण्याचे आवाहन राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी यावेळी केले.

## रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांच्या बदलीची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

प्रशासकिय कामात दिरंगाई चालढकल पणा करणे लोकप्रतिनिधी व वरीष्ठांच्या आदेशा कडेही कानाडोळा करणे अशा वृत्तीमुळे दप्तर दिरंगाई नुसार राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्यावर शासनाने त्वरीत कारवाईचा वडगा उगारून निष्क्रीय अधिक्षक यांची त्वरीत रायगडातुन बदलीचे आदेश काढावे अशी मागणी रायगड वासीयांतुन होत आहे

रायगड जिल्ह्यात पनवेलसह,पेण ,उरण,अलिबाग ,मुरूड,रोहातालुक्यात गावठी दारूचा बेकायदेशीर धंदा सुसाट सुरू असताना गारंबी,गोपाळवाटच्या परीसरात विविध गावात हातभट्ट्या मोठ्या प्रमाणात आहेत .

त्यातच मसाडी, बेलवाडी, टिटवी, पारगाण, नागशेत आदी भागात हातभट्या सुरू आहेत असा नागरीकांचा आरोप आहे वरील हाथभट्याची गावठी दारू रायगडच्या विविध भागात सप्लाय केली जाते याबाबत यांना आळा घालण्याचे काम राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांचे असताना ते मात्र या बाबीकडे गांभीर्याने घेत नाही याचे नागरीकांतुन आश्चर्य व्यक्त केले जात आहे

राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील वाइन शॉप, परमिट रूम यांचे परवाने नुतनिकरण ३१ मार्च पर्यंत करणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय आहे

त्या नुसार सबंधीत मालक, चालक आपले परवाने लवकरात लवकर नुतनीकरण व्हावे या हेतुने सर्व कागदपत्रे दप्तर तपासणी वेळीच करून स्टेट बॅकेत चलन भरून आपला व्यवसाय ज्या ठिकाणी आहे तेथील तालुक्याच्या ठिकाणी असलेले राज्य उत्पादन शुल्क तालुका कार्यालयात संपुर्ण नुतनिकरणाचे कामकाज पुर्ण करतात

तालुका राज्य उत्पादन शुक्ल अधिकारी अत्यंत कामसु चांगले अधिकारी कर्मचारी असल्याने परवाने नुतनीकरण बाबत संबधीत विविध फाईल्स ह्या राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्याकडे त्या पुढे पाठविल्या जातात

परंतु नुतनिकरणाकरीता आलेल्या फाईल्स मध्ये काहीतरी क्युरी काढुन संबधीत परमिट रूम वाईन्सशॉप व ईतर व्यावसाईकांनी मुख्य साहेबांची सदिच्छा भेट घेतल्याशिवाय त्यांच्या नुतनिकरणाच्या फाईल्स वर साहेब स्वाक्षरी करीतच नाहीत असा आरोप रायगड जिल्ह्यातील चालक मालक खाजगीत बोलत आहेत.

## रेल्वे स्थानकाबाहेर चोरट्यांचा धुमाकूळ

**पनवेल :** बामणडोंगरी रेल्वे स्थानकाबाहेर दुचाकी चोरीच्या अनोख्या प्रकारामुळे वाहनधारकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानकाबाहेर पार्क केलेल्या दुचाकींमधील महत्त्वाचा मानला जाणारा ईसीएम (इलेक्ट्रॉनिक कंट्रोल मॉड्युल) हा भाग चोरण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे.पुन्हा असाच प्रकार घडल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.एका तरुणाने दुचाकी बामणडोंगरी रेल्वे स्थानकाबाहेर उभी करून पुढील प्रवासासाठी गेला होता. परत आल्यानंतर वाहन सुरू होत नसल्याने तरुणाने तपासणी केली असता इसीएमचा भाग गायब असल्याचे समोर आले.

## अनधिकृत नर्सरी व शेडवर सिडकोची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर–२९ येथील कॉर्पोरेट पार्कसाठी राखीव असलेल्या सिडकोच्या भूखंडावरील अनधिकृत बांधकामांवर सिडकोने मोहीम राबविली. या कारवाईदरम्यान अंदाजे २० हजार चौरस मीटर क्षेत्रावरील तीन अनधिकृत नर्सरी शेड, तीन पत्रा शेड तसेच दोन पया विटांच्या बांधकामांचे निष्कासन करण्यात आले.

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विभागामार्फत ही मोहीम राबविण्यात आली. संबंधित बांधकामे सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून तसेच सिडकोची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली होती. त्यामुळे नियोजित विकासकामांमध्ये अडथळा निर्माण होत असल्याने मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर नोडचे नियंत्रक श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई ही कारवाई करण्यात आली.

पान १ वरुन

## गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि करिअर मार्गदर्शन शिबिर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त

केवळ पारंपारिक शिक्षणावर अवलंबून न राहता बदलत्या काळाची पावले ओळखून विद्यार्थ्यांनी स्वतःला कसे तयार करावे याचे उत्तम मार्गदर्शन त्यांनी केले. या यशस्वी कार्यक्रमाचे नियोजन जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष तथा पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महेश सरदेसाई, रूपेश नागवेकर, अल्पेश पाडावे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत चोखपणे पार पाडले होते.

या सोहळ्याला भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका कविता चौतमोल, दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, माजी नगरसेविका नीता माळी, सुहासनी शिवणेकर, सुरेका मोहकर, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, प्रदीप सावंत, डी. एल. भोईर, उमेश इनामदार, डॉ. विलास मोहकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना उदंड आयुष्याच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

## चिरनेर येथील रिक्षा चालकाचा प्रामाणिकपणा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील रिक्षाचालक श्याम नारायण चौलकर यांनी त्यांच्या प्रवासी रिक्षात सापडलेला मोबाईल संबंधित व्यक्तीला खात्री करून चिरनेर पोलीस चौकीतील पोलिसांच्या समक्ष परत केला. त्यामुळे या प्रामाणिक रिक्षा चालकाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

रिक्षाचालक श्याम चौलकर हे काल गुरुवारी आपल्या नेहमीच्या चिरनेर, कोप्रोली, उरण मार्गावरील प्रवाशांना घेऊन जात असताना, सायंकाळच्या सुमारास प्रवासी उतरल्यानंतर त्यांना रिक्षाच्या शीटच्याखाली मोबाईल पडल्याचे दिसून आले.

तोपर्यंत रिक्षातील सर्व प्रवासी हे निघून गेले होते.त्यामुळे रिक्षा चालक शाम चौलकर यांनी आजूबाजूला असणाऱ्या प्रवाशांकडे चौकशी केली. मात्र चौकशी करणाऱ्या प्रवाशांपैकी हा मोबाईल कोणाचाच नसल्यामुळे, त्यांनी जवळच असलेली चिरनेर पोलीस चौकी गाठली. यावेळी पोलिसांनी त्या मोबाईलद्वारे संपर्क साधला असता तो मोबाईल एका भारत सिंग या परप्रांतीय व्यक्तीचा असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

त्यानुसार त्या परप्रांतीय व्यक्तीला चिरनेर पोलीस चौकीत बोलावून, त्या व्यक्तीची पूर्ण खात्री करून त्याला त्याचा मोबाईल पोलिसांच्या समक्ष परत केला.

मागील काही महिन्यांपूर्वी श्याम चौलकर यांना एका महिलेचे पॅनकार्ड, आरसी बुक, एटीएम कार्ड अशी तेरा प्रकारची महत्वाची कागदपत्रे व काही रक्कम असलेली लेडीज पर्स सापडली होती. मात्र चौलकर यांनी ती महत्वाच्या कागदपत्रांची लेडीज पर्स संबंधित महिलेला पोलिसांच्या मदतीने परत केली.

## चांभार्ली ग्रामपंचायतीला दीनदयाळ उपाध्याय पंचायत सुरक्षित पुरस्कार

**मोहोपाडाः प्रतिनिधी**

भारत सरकारच्या पंचायतराज मंत्रालयामार्फत दिला जाणारा प्रतिष्ठित असा दीनदयाळ उपाध्याय पंचायत सुरक्षित पुरस्कार हा रायगड जिल्ह्यातील रसायनीतील चांभार्ली ग्रामपंचायतीला मिळाला .




नवी दिल्ली येथे दि. ३ जून २०२६ रोजी झालेल्या शासकीय कार्यक्रमात केंद्रीय मंत्री पंचायत राज मंत्रालय राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंग व केंद्रीय राज्यमंत्री पंचायत राज मंत्रालय एस.पी. सिंह बघेल यांच्या हस्ते चांभार्ली गावाचे सरपंच प्रतिप पाटील, उपसरपंच स्वप्निल जांभळे, माजी उपसरपंच समीर पाटील यांनी स्विकारला.

दीनदयाळ उपाध्याय पंचायत सुरक्षित विकास पुरस्कार हा स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद) शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार असून ग्रामपंचायतींना अधिक सक्षम, पारदर्शक बनवून ग्रामीण भागात शाश्वत विकास साध्य करता यावा, हे या पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. आरोग्यसंपन्न, दारिद्र्यमुक्त, बालस्नेही, जल समृद्ध, पर्यावरण स्नेही, पायाभूत सुविधांनीयुक्त, सामाजिक सुरक्षित व न्याय्य, सुशासनयुक्त व महिलास्नेही ग्रामपंचायत अशा ९ थीममध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पंचायतींना हा पुरस्कार दिला जातो.

विजेत्या पंचायतींना ५० लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंतची रक्कम पुरस्कार म्हणून दिली जाते, जी ग्रामीण विकासासाठी वापरली जाते.

या अंतर्गत खालापूर तालुक्यातील चांभार्ली ग्रामपंचायत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर पुरस्कार विजेती झाली आहे. चांभार्ली ग्रामपंचायतीस सामाजिकदृष्ट्या सुरक्षित व सामाजिक न्याय्य गाव या थीममध्ये देशात संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेलमध्ये वृक्षारोपण

## ’आपलं पनवेल, स्वच्छ, हरित पनवेल’ बनविण्यासाठी आपण प्रयत्न करूया : महापौर नितीन पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मागील वर्षी पालिकेने ५२ हजार झाडे लावली, विशेष म्हणजे ही सर्व देशी बनावटीची झाडे आहेत. या वर्षीही महापालिकेने १ लाख झाडे लावण्याचे उद्दीष्ट हाती घेतले आहे. या वृक्षारोपण मोहिमेसाठी पालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे. 'आपलं पनवेल, स्वच्छ, हरित पनवेल' बनविण्यासाठी आपण प्रयत्न करूया असे आवाहन महापौर नितीन पाटील यांनी केले.



आज जागतिक पर्यावरण दिन (०५ जून) निमित्त पनवेल महानगरपालिका, प्रभाग समिती ' ड' पनवेल अंतर्गत तक्का ब्रीज शेजारी, हायवे जवळ पनवेल येथे वृक्षारोपण कार्यक्रमाद्वारे ‘वृक्षारोपण मोहिम २०२६’ ची सुरूवात करण्यात आली. यावेळी महापौर बोलत होते. या कार्यक्रमाला आयुक्त मंगेश चितळे, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंझारराव, नगरसेविका अस्मिता घरत, उद्यान विभाग उपायुक्त नानासाहेब कामठे, उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे, उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वृक्षारोपण कार्यक्रमात अशोक, कांचन, ताम्हणफुल, करंज इत्यादी ५० देशी प्रजातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

तसेच कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे उद्यान पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कामगार, स्थानिक पर्यावरण प्रेमी, स्थानिक रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. याचबरोबर नावडे, खारघर, कळंबोली, कामोठे प्रभागातही वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आले.पनवेल महापालिका करणार १ लाख वृक्षांचे रोपण पनवेल महापालिकेच्यावतीने २०२६ या वर्षभरात सुमारे १ लाख झाडांचे रोपण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरूवात आज पर्यावरण दिनाच्या निमित्ताने करण्यात आली.

या वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये देशी झाडांची लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये पनवेल मनपा उद्यान विभागामार्फत १५ हजार झाडे, ग्रीन यात्री संस्था व पालिका यांच्या माध्यमातून नावडे, खारघर व तळोजा येथे ३५ हजार झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच मियावाकी पध्दतीने ५० हजार झाडे लावण्यात येणार आहे. महापालिकेच्यावतीने बांबू लागवड

केंद्र शासनाचे राष्ट्रीय बांबू अभियान आणि महाराष्ट्र शासनमार्फत अटल बांबू समृध्दी योजना राबविली जात आहे. या अंतर्गत महापालिकेने मागील वर्षी ७ हजार बांबू रोपाची लागवड केली आहे.

## श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात जागतिक पर्यावरण दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

झाडे लावा झाडे जगवा याचे महत्त्व सांगत विद्यालयात शिक्षकांसमवेत मान्यवरांनी वृक्षारोपण करत पर्यावरण दिन साजरा केला.या दिनाचे औचित्य साधत वेगवेगळ्या प्रकारचे झाडे विद्यालयाच्या आवारात लावण्यात आले.एक व्यक्ती पाच झाडे असा संकल्प करत पर्यावरण वाचक संदेश देत मान्यवरांनी उपस्थित शिक्षकांना तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आवाहन करत वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले.

याप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, स्कूल कमिटी मेंबर सुरेश पाटील, अमोध ठक्कर (प्राचार्य सीनियर कॉलेज फुंडे ).डी.पी सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे तसेच उपस्थित सर्व शिक्षक वृंद व सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समवेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नावडे, खारघर, कळंबोली आणि कामोठे येथे वृक्षारोपण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि महापालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहभागातून हे उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.

खारघर प्रभाग :- खारघर सेक्टर-२१ येथील ग्रामविकास भवन शेजारील भूखंड क्रमांक ३ येथे उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आवळा, करंज, ताम्हण, कांचन, पेरू, काजू आणि चिंच यांसह सुमारे १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास महापालिका सदस्य प्रवीण पाटील, अनिता पाटील, मधु पाटील, परेशा ब्रिजेश पटेल, शत्रुघ्न काकडे, लीना गरड आणि अजित अडसुळे यांची उपस्थित होते. तसेच प्रभाग अधीक्षक जितेंद्र मढवी, उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, स्वच्छता निरीक्षक अतुल मोहकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सनराइज, आर संकल्प फाउंडेशन, के.एल.ई. महाविद्यालय कळंबोलीचे प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) युनिटच्या विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परिसरातील ज्येष्ठ नागरिक आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





नावडे उपविभाग :- नावडे उपविभागातील पिसार्वे तलाव परिसरात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमास विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे, महापालिका सदस्य हरेश केणी, जनार्दन पाटील, विजयश्री पाटील, योगिता फडके, लीना म्हात्रे आणि नंदकुमार म्हात्रे उपस्थित होते.

कळंबोली प्रभाग समिती ‘ब :-कळंबोली प्रभाग समिती ‘ब’ अंतर्गत रोडपाली, सेक्टर-१७ येथील भूखंड क्रमांक ४ येथे आयोजित कार्यक्रमात कांचन, ताम्हण, करंज, पेरू आदी १०० देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम तसेच महापालिका सदस्य अमर पाटील, रवींद्र भगत, सरस्वती काथारा, बायजा बारगजे आणि दमयंती भोईर, रविनाथ पाटील उपस्थित होते. स्थानिक रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनीही सहभाग घेतला.

कामोठे प्रभाग समिती क :- कामोठे प्रभाग समिती ‘क’ अंतर्गत सेक्टर-८ येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागील मैदानात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या ठिकाणी कांचन, ताम्हण आणि करंज यांसह विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास महापालिका सदस्य अरुणकुमार भगत, विकास घरत, सामाजिक कार्यकर्ते सुरेश खरात तसेच स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. विविध ठिकाणी झालेल्या या वृक्षारोपण उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्रात वाढ आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. वृक्ष लागवडीबरोबरच त्यांच्या संगोपनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

## तक्का परिसरात महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पनवेल मध्ये शुक्रवारी पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा मुख्य शुभारंभ तक्का येथील हायवे लगतच्या परिसरात करण्यात आला. यावेळी केवळ झाडे लावणे एवढाच या मोहिमेचा हेतू नसून, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी लावलेल्या झाडांचे योग्य जतन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, असे आवाहन महापौर नितीन पाटील यांनी याप्रसंगी नागरिकांना केले. या वेळी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, सभागृहनेते प्रकाश बिनेदार,नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंजारराव, गणेश कडू, नगरसेविका अस्मिता घरत, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर उपस्थित होते.



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धाकटा खांदा येथे वृक्षारोपण व मोफत रोपवाटप कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १४ च्या वतीने धाकटा खांदा येथे वृक्षारोपण व मोफत रोपवाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जनसहभागातून संपन्न झाला. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले.

केंद्र सरकारच्या “एक झाड आईच्या नावाने” या संकल्पनेला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे नागरिकांना मोफत वितरित करण्यात आली.



तसेच परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यांसारख्या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. केवळ झाडे लावणे नव्हे तर त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि हरित भविष्य घडविण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका सारिका भगत, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, भारतीय जनता पार्टी ओबीसी सेलचे अध्यक्ष सतीश पाटील, प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, युवा मोर्चा प्रभाग अध्यक्ष कृणाल पाटील यांच्यासह स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. धाकटा खांदा गावातील नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## हरिग्रामजवळ कार पडली खड्ड्यात

**नवीन पनवेल :** हरिग्राम जवळील खड्ड्यात चार चाकी कार पडल्याची घटना चार जून रोजी दुपारच्या सुमारास घडली. या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही.



चार जून रोजी चार चाकी कार जात असताना हरिग्राम जवळील खोल खड्ड्यात पडली. यापूर्वी देखील या खड्ड्यात अनेक कार पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यानंतर या ठिकाणी लोखंडी रेलिंग लावण्यात आले. मात्र तरी देखील कार पडण्याच्या घटना थांबत नाहीत. दुपारच्या सुमारास चार चाकी कार वरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि चार चाकी कार थेट २० ते २५ फूट खाली कोसळली. यात कारचे नुकसान झाले आहे, मात्र कोणतीही जीवित हानी झाली नसल्याचे प्रत्यक्षदर्शिनी सांगितले. या ठिकाणी असलेल्या वळणामुळे कारवरील नियंत्रण सुटून अपघात होतात. त्यामुळे या ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणी केली जात आहे.

## अपर तहसीलदारांच्या तत्परतेमुळे चिमुकलीचे प्राण वाचले

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासकीय यंत्रणेतील संवेदनशीलता आणि तत्पर कार्यपद्धतीचे उत्कृष्ट उदाहरण अपर पनवेल तहसील कार्यालयाने नुकतेच घालून दिले आहे. एका गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या अवघ्या एक वर्षांच्या चिमुकलीच्या उपचारासाठी आवश्यक असलेला उत्पन्नाचा दाखला एका दिवसात उपलब्ध करून देत अधिकाऱ्यांनी दाखविलेल्या कार्यतत्परतेमुळे तिच्यावर वेळेत शस्त्रक्रिया होऊन तिचे प्राण वाचल्याची हृदयस्पर्शी घटना घडली आहे.

मौजे महोदर, ता. पनवेल येथील रमेश बुधाजी भुकरा यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची आहे. त्यांच्या एक वर्षांच्या कन्या कु. अस्मिता हिला हृदयाला छिद्र असल्याचे निदान झाले होते. डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. उपचारासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक असल्याने भुकरा कुटुंब मोठ्या चिंतेत होते. या परिस्थितीत रमेश भुकरा यांचे भाचे समीर पारधी यांनी पनवेल तहसील कार्यालयात धाव घेतली. त्यांनी अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे व निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांना संपूर्ण वस्तुस्थिती सांगून उत्पन्नाचा दाखलो देण्याची विनंती केली.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले त्यानुसार निवासी नायब तहसीलदार शेलार यांनी अर्जाची त्वरित दखल घेत अवघ्या एका दिवसात उत्पन्नाचा दाखला उपलब्ध करून दिला. सदरचा दाखला मिळताच तो मुंबईतील वाडिया रुग्णालयात सादर करण्यात आला. त्यामुळे अस्मिता हिच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत आणि यशस्वीरित्या पार पडली.

## महानगरपालिका आयुक्तांकडून विविध कामांचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज दिनांक ५ जून रोजी आयुक्त मंगेश चितळे यांनी विभागप्रमुखांच्या बैठकित जनगणना, एसआयआर कामकाज आढावा, नालेसफाई व मान्सूनपूर्व कामे , अतिक्रमण ,अनधिकृत होर्डिंग, धोकादायक इमारती,पाणी नियोजन अशा विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त अभिषेक पराडकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखापरीक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने, शहर अभियंता संजय



कटेकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय सफाई कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. भारताची जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी व घरगणनेचे काम चारही प्रभागात सुरू असून या कामकामाचा आढावा आयुक्तांनी घेतला. जनगणना विषयक कामे लवकरात लवकरात कामे करण्याच्या सूचना यावेळी आयुक्तांनी दिल्या. तसेच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात केंद्रीय निवडणुक आयोगाच्यावतीने मतदार याद्यांचे विशेष सखोल फेरनिरीक्षण(एसआयआर) कामे सुरू आहेत. या एसआयआर कामांचा आढावा आयुक्तांनी घेतला. याचबरोबर आपले सरकार पोर्टल, ग्रीव्हीयन्स यावर आलेल्या विविध तक्रारींविषयक विभागवार माहिती घेऊन त्या लवकरात लवकर सोडविण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. नालेसफाईची पुर्ण झालेली कामे, पुर्णत्वास आलेली कामे, शिल्लक कामे यांचा प्रभागवार आढावा आयुक्तांनी घेतला. तसेच जास्त पावसाचे पाणी साठणाऱ्या जागा, त्याठिकाणी पंपिंग सिस्टीम सोय, या अनुषंगाने येणारी सर्व कामे यांचा यावेळी आढावा घेण्यात आला. याचबरोबर झाडांच्या फाद्यांच्या छाटणी, इतर कामे यांवर चर्चा करण्यात आली. महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील धोकादायक इमारतीच्या अनुषंगाने त्यांचा पाणीपुरवठा बंद करणे, वीज बंद करण्याबाबत महावितरण विभागास पत्र देणे, धोकादायक इमारती रिकाम्या करणे, रिकाम्या इमारती पाडणे यासाठी पोलिस विभागास पत्र व्यवहार करण्याच्या सूचना संबधित विभागास आयुक्तांनी दिल्या.


## संपादकीय

# हुकूमशाहीला हादरा

पश्चिम बंगालमध्ये माजी मुख्यमंत्री व आजवरच्या तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांच्या राजकीय कारकिर्दीचा अस्त सुरू झाल्याची चिन्हे सुस्पष्टपणे दिसत आहेत. आमदारांच्या बंडापाठोपाठ आता तृणमूलचे खासदार देखील ममतांना धक्का देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा असून पक्षावरील पकड गमावून बसलेल्या हतबल ममता यांनी बंडाळीविरोधात कोर्टाचे दरवाजे ठोठावण्याची भाषा सुरू केली आहे.

**निवडणुकीत पश्चिम बंगालमधली सत्ता गमावल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी अजब वर्तन केले होते. शांतपणे पराभव मान्य न करता त्यांनी चक्क मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. अर्थात ममतादीदींचा आक्रस्ताळेपणा अवघ्या देशाच्या परिचयाचा असल्याने या वर्तनानेही कुणाला फार आश्चर्य वाटले नव्हते. अल्पकाळातच त्यांच्या पक्षातील मतभेद चव्हाट्यावर येऊ लागले. पक्षातील अंतर्गत वाद मिटवण्याचा प्रयत्न ममता बॅनर्जी यांनी केला, पण त्यांनी बोलावलेल्या आमदारांच्या बैठकीकडेही जवळपास ६० आमदारांनी पाठ फिरवल्यानंतर तृणमूलमधील वाद विकोपाला जाणार हे स्पष्ट झाले. आता तर आमदारांच्या बंडखोरीनंतर तृणमूल काँग्रेसच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या सगळ्या घटनाक्रमात आश्चर्यकारक काहीच नाही. काँग्रेस पक्षाला सोडचिठी देऊन व डाव्या पक्षांची जुलमी राजवट उलथवून पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आलेल्या ममता बॅनर्जी यांनी अल्पकाळातच आपण किती टोकाची हुकुमशाही, भ्रष्ट, हिंसक राजवट राबवू शकतो हे दाखवून दिले. त्यांनी गरीबांसाठी काम करत असल्याचा आव आणला खरा, पण त्यांच्या कार्यकाळात पश्चिम बंगालमध्ये अनेक घोटाळेच अधिक गाजले. महिला मुख्यमंत्री असताना महिलांच्या सुरक्षिततेचा कधी नव्हे इतका मोठा प्रश्न निर्माण झाला. तृणमूल काँग्रेसच्या गुंडगिरीला राज्यभरात संरक्षण मिळाले. भयभीत बंगाली जनता या सर्व प्रकारांनी हबकून गेली होती. इतकेच काय तर पक्षांतर्गत हुकुमशाहीला तृणमूल काँग्रेसमधील अनेक जुनी नेतेमंडळीही कंटाळली होती हेही आता उघड झाले आहे. तृणमूल काँग्रेसची सर्व सूत्रे ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या हातात एकवटल्यानंतर पक्षातील अस्वस्थता शिगेला पोहोचली. सत्ता हातात असेपर्यंत पक्षातील नेतेमंडळी ममता यांच्या नेतृत्वाचे गुणगान करत होती. आता बंडाळी केल्यानंतरही पक्षाच्या आमदारांनी ममता यांच्या नेतृत्वाला आव्हान देण्याचे टाळले आहे. त्यांनी विधानसभा अध्यक्षांकडे सादर केलेल्या पत्रात तृणमूलच्या अध्यक्ष म्हणून ममता बॅनर्जी यांचेच नाव ठेवण्यात आले आहे. मात्र विधिमंडळ पक्षाच्या कामकाजाबाबत त्यांचा भाचा अभिषेक बॅनर्जी यांचे अधिकार आपल्याला मान्य नाहीत असे बंडखोर आमदारांनी स्पष्ट केले आहे. पक्षातील कोणालाही विश्वासात न घेता अभिषेक बॅनर्जी यांनी विरोधीपक्ष नेत्याच्या नियुक्तीचे पत्र दिले व या पत्रावर पक्षाच्या काही आमदारांच्या सह्याही परस्पर ठोकण्यात आल्याचा दावा या बंडखोर आमदारांनी केला. त्यानंतर पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांना ५८ बंडखोर आमदारांनी विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून पाठिंबा देत विधानसभेच्या अध्यक्षांना याबाबतचे पत्र सादर केले. अध्यक्षांनी या गटाला मान्यता दिल्यामुळे पश्चिम बंगालमधील बंडाळीने निर्णायक वळण घेतले. पक्षांतरबंदी कायद्यानुसार, सध्या विधानसभेत तृणमूलचे ८० आमदार असल्याने फुटून निघालेल्या गटाला विधिमंडळ पक्षाच्या किमान ५४ सदस्यांचा पाठिंबा असणे आवश्यक होते. बंडखोर गटाने ५८ आमदारांच्या स्वाक्षऱ्या असलेले पाठिंबा पत्र सादर केल्याने विधानसभा अध्यक्षांनी या गटाला मान्यता दिली. या मान्यतेनंतर पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्रातील पक्षफुटीसारखी स्थिती उद्भवण्याचे चित्र निर्माण झाले आहे.**

# शिवराज्याभिषेक : अलौकिक महत्त्व व गरज



६ जून १६७४ या दिवशी रायगडावर विधिवत संपन्न झालेला शिवरायांचा राज्याभिषेक ही ऐतिहासिक घटना संपूर्ण भारतासाठीच अनन्यसाधारण अशी घटना होती. मध्ययुगीन काळातील विविध अन्यायी यावनी सत्तेच्या राजवटीविरोधात कल्याणकारी व प्रजावत्सल तसेच लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करून भविष्यातील आदर्श राज्याची मुहूर्तमेढच छत्र धारण करून शिवरायांनी रुजवली.

राज्याभिषेक होण्यापूर्वीच आदर्श व दुर्गम असा रायरीचा गड हेरून तेथे आवश्यक बांधकाम करून महाराजांनी याला रायगड हे नाव दिले. राज्याभिषेकापूर्वी इंग्रज वकील थॉमस निकोलसन हा १६७३च्या मे महिन्यात या गडावर व्यापारी बोलणी करण्यासाठी आला होता. त्याने असे वर्णन केले आहे की, अगदी मोजक्या शिबंदीसह हा किल्ला मराठे लढवू शकतात. जगातील बलाढ शत्रू जरी येथे आला तरीही गड कधीच पराजित होऊ शकणार नाही. महाराजांनी या किल्ल्याची राजधानी म्हणून केलेली निवड किती सार्थ होती हे यातून समजून घेता येते. याच दुर्गम गडावर राज्याभिषेकचा अवर्णनीय सोहळा पार पडला.

मूळचे महाराष्ट्रातील पैठणचे मात्र अनेक पिढांपासून वाराणसीला स्थायिक झालेल्या गागाभट्ट यांनी राज्याभिषेक सोहळा विधिवूर्वक संपन्न करून व शिवरायांवर छत्र धरले. अनेक आव्हानांना लिलया पेलून राजे खऱ्या अर्थाने छत्रपती बनले.

या राज्याभिषेक प्रसंगी सुरत येथील इंग्रज व्यापारी हेन्री ऑक्सिंडेन व त्याचे दोन सहकारी थॉमस मायकेल व जॉर्ज रॉबिन्सन यांच्या सहित रायगडला आला. विशेष म्हणजे ३ मे १६७४ ते ६ जून १६७४पर्यंत हे तिघेही तब्बल ३३ दिवस रायगडावर उपस्थित होते. हेन्रीने राज्याभिषेक प्रसंग व रायगडावरील लोक, मेजवानी व्यवस्थापन, बाजार, राजाचे पाहुणे, सोहळा विधी, सिंहासन इत्यादी अनेक बाबी स्वतःच्या डायरीमध्ये नोंदविल्या म्हणून छत्रपतींचा राज्याभिषेक सोहळा कसा होता हे आजही अनुभवता येऊ शकते हे विशेष.

महाराजांना त्याकाळी राज्याभिषेक का करून घ्यावा लागला व त्याची गरज का वाटली हे समजून घेण्यासाठी अनेक पैलूंचा अभ्यास करावा लागतो. ती कारणे संक्षिप्तपणे समजून घ्यावी लागतात.

१) मध्ययुगीन काळात संपूर्ण हिंदुस्थानातच यावणी सत्तांनी धुमाकुळ घातला होता. तत्कालीन उत्तरेतील मोघल व दक्षिण भारतातील विजापूरची आदिलशाही तसेच गोवलकोंडा येथील कुतूबशाही या मुस्लिम सत्ता लोकाभिमुख नव्हत्या. शिवाय इथियोपिया येथून आलेले व पुढे सिध्दी नावाने ओळखल्या गेलेले हबसान प्रांतातील सिध्दी यांनीही धार्मिक उच्छाद मांडून प्रजेची पिळवणूक केली होती. वरील सर्व सत्ताधीश मूळचे भारताबाहेरून आलेले होते. येथील प्रजा, धर्म, संस्कृती यांच्याविषयी कोणतेही सोयरसुतक यांना असण्याचे कारण नव्हते. त्या पार्श्वभूमीवर इतदेशीय राजाची सत्ता प्रजेसाठी आवश्यक होती.

२) विजयनगर या हिंदू सत्तेचा अस्त सन १५६५ या वर्षी तालीकोट युध्दात झाला. त्यामुळे इतदेशीय सत्तेची गरज लक्षात घेता राजांचा राज्याभिषेक होणे आवश्यक होते.

३) सन १५१० या वर्षी पोर्तुगीजांनी गोवा हा प्रांत आदिलशाहाकडून जिंकून घेतला. त्यानंतर डच, इंग्रज व फ्रेंच यांनीही भारतातील विविध प्रांतात आपल्या वखारी काढल्या. या परकीय व्यापाऱ्यांचा उद्देश भारत बळकावणे हाच होता. तत्कालीन भारतातील सत्ताधीशांमध्ये युरोपीय लोकांचा मूळ उद्देश समजून घेऊन त्यांना भविष्यात रोखण्याची दूरदृष्टी नव्हती. शिवाजी महाराजांना मात्र हा धोका लक्षात आला होता व त्यादृष्टीने स्वराज्य निर्माण करून राज्याभिषेकची आवश्यकता होती.

४) सार्वभौम राजसत्तेला मध्ययुगीन काळात विशेष स्थान होते. राजा हा ईश्वराचा अंश मानला जाई. राजेपद हे वंशपरंपरेने मानले जाई. राजाने दिलेले कौल, वतनपत्रे, सनद इत्यादींना महत्व व मान्यताही असे. परिणामी महाराजांना राज्याभिषेक करणे अत्यावश्यक होते. कारण जनसमुदायात शिवरायांबद्दल अपार श्रध्दा असूनही व्यावहारीकरित्या प्रजेला आदिलशाही व मोगली सनदाच महत्वाच्या वाटायच्या. या बाबीला राज्याभिषेकाद्वारेच उत्तर दिले जाऊ शकत होते.

५) त्या काळी मोगल व दक्षिणेतील शाहांनीही शिवाजी म्हणजे बंडखोर व टोळ्या जमवून लुटालूट करणारा जमीनदाराचा पोरगा असा प्रचार चालविला होता. एवढेच नव्हे, तर पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच सुध्दा महाराजांना दरोडेखोर, लुटारू वा बंडखोर इत्यादी विशेषणांनीच संबोधित. त्या पार्शवभूमीवर विधिवत राज्याभिषेक होणे गरजेचेच होते.

६) महाराजांच्या ताब्यात ३४०च्या वर गडकोट होते. राजांनी विविध जलदुर्ग व मध्ययुगीन काळात प्रथमच आरमाराचीही स्थापना केली होती. स्वतःच्या एका सलग भूप्रदेशावर अंकुश ठेवण्यासाठी व त्या प्रदेशातील जनतेवर नियंत्रण ठेवणे व कायद्याचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी राज्याभिषेक ही बाब आवश्यक होती.

७) त्याकाळी जनसामांन्यात अशी भावना होती की, कलियुगात म्लेंच्छांचेच राज्य येईल व प्रजेला हाल स्विकारल्याशिवाय पर्याय नसेल. तत्कालीन विविध ग्रंथांनीही वरील गैरसमजला हातभार लावला होता. अर्थात वरील गैरसमज दूर करण्यासाठी लोकोत्तर कार्य केलेल्या शिवरायांना राज्याभिषेक करणे अगत्याचे होते.

८) महाराष्ट्रातील अनेक नामांकित घराणे, उदा. जाधव, भोसले, घोरपडे, निंबाळकर, घाटगे, खोपडे इत्यादींनाही शिवाजी राजे हे स्वतःसारखेच जमीनदार वाटत. विशेष बाब ही की, यातील काही जण महाराजांचे गणगोत होते, मात्र राजांची कर्तबगारी स्वीकारण्याची त्यांची मानसिकता नव्हती. याउलट आदिलशाही किंवा मोगल त्यांना जवळचे वाटून त्यांचीच चाकरी करण्यात त्यांना धन्यता वाटे. परिणामी अनेक आणीबाणीच्या प्रसंगात वरील मंडळी शत्रूला सामील होऊन महाराजांना त्रासदायक ठरत. परिणामी आपले आदेश यांच्यावर चालले पाहिजे, जेणेकरून यांना नियंत्रित ठेवता येईल यासाठी स्वराज्य निर्माण करणे स्वअस्तित्व सिध्द करण्यासाठी राज्यभिषेक करणे गरजेचे होते.

९) विविध सत्ताधीशांसोबत बरोबरीचे बोलणे करणे व त्याला वैधानिक स्वरुप प्राप्त करून देण्यासाठी राज्याभिषेकची आवश्यकता होती.

१०) महाराजांनी तयार केलेले प्रजावत्सल कायदे, राज्यव्यवहार कोष, इत्यादीची परिणामकारक अंमलबजावणीसाठी राजा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी राज्यभिषेकाची आवश्यकता होती.

मराठांच्याच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठीही व जगासाठीही अत्यंत प्रेरणादायक घटना म्हणजे राज्याभिषेक होता. शिवरायांनी समर्थपणे निर्माण केलेली राजवट चिरकाल टिकण्यासाठी राज्याभिषेक किती महत्वाची बाब ठरली हे औरंगजेबाने मराठांना नष्ट करण्यासाठी दक्षिणेवर १६८०ला केलेल्या पाशवी आक्रमणाचा विचार केल्यास लक्षात येते. या आक्रमणाचा मराठांनी सक्षमपणे मुकाबला केला. शेवटपर्यंत मराठा साम्राज्य औरंगजेबला नष्ट करता आले नाही. त्याचा खजिना, मनुष्यबळ येथेच संपुष्टात येऊन १७०७ या वर्षी दक्षिणेतच त्याची कबर खोदली गेली. २७ वर्षाचा दीर्घ संघर्ष मराठे देऊ शकले, कारण शिवछत्रपतींचे लोकाभिमुख स्वराज्य व स्वाभिमानी दृष्टीच होय.

**–डॉ. श्रीकांत पाटील, संचालक,**
**आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ**




## दोन दिवस चालणारा Moto G३७ Power स्मार्टफोन

स्मार्टफोनच्या बाजारात सध्या अधिक मेगापिक्सेल, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर आणि वेगवान प्रोसेसरच्या जाहिरातींचा गदारोळ सुरू असताना मोटोरोलाने सामान्य ग्राहकांच्या नेमक्या गरजा ओळखून Moto G३७ Power आणि Moto Buds २ हे दोन भन्नाट प्रोडक्ट्स लाँच केले होते.



बहुतेकांना दिवसभर चालणारी बॅटरी हवी असते. फोन वारंवार हँग होऊ नये अशी अपेक्षा असते. स्पीकर चांगले असावेत, कॅमेऱ्याने समाधानकारक फोटो यावेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे फोन वापरताना अनावश्यक जाहिराती किंवा बिनकामाची ॲप्स यांनी त्रास देऊ नये. मोटोरोलाने नव्या Moto G३७ Power आणि Moto Buds २ या उत्पादनांद्वारे याच गरजांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. या फोनचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची तब्बल ७००० mAh क्षमतेची बॅटरी. सध्या स्मार्टफोन उत्पादक कमी जाडीचे सडपातळ आणि आकर्षक फोन तयार करण्याच्या नादात बॅटरीच्या क्षमतेशी तडजोड करताना दिसतात. त्याच्या उलट मोटोरोलाने या फोनमध्ये बॅटरीलाच केंद्रस्थानी ठेवले आहे.

प्रत्यक्ष वापरात ही बॅटरी दोन दिवस सहज टिकू शकते, असे रिव्ह्यूदरम्यान लक्षात आले. सतत फोनवर काम करणारे पत्रकार, प्रवास करणारे व्यावसायिक, विद्यार्थ्यांपासून ते ग्रामीण भागातील वापरकर्त्यांपर्यंत अनेकांसाठी ही बाब महत्त्वाची आहे. पॉवरबँक किंवा चार्जर घेऊन फिरण्याची गरज त्यामुळे कमी होते, हा या फोनचा सर्वात मोठा फायदा आहे.

फोनचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे म्हणजे अँड्रॉइड अनुभव. अनेक कंपन्यांच्या फोनमध्ये काही ॲप्स आधीपासूनच प्री– लोडेड असतात. वापरकर्त्यांना नको असलेल्या जाहिराती किंवा नोटिफिकेशन्स सतत येत राहतात. Moto G३७ Power या बाबतीत वेगळा ठरतो. इंटरफेस साधा, सुंदर आणि वापरण्यास सोपा असा आहे.

कामगिरीच्या बाबतीत हा फोन मध्यमवर्गीय ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणारा आहे. सोशल मीडिया, व्हॉट्सॲप, ई–मेल, वेब ब्राउझिंग, व्हिडीओ स्ट्रीमिंग आणि दैनंदिन मल्टिटास्किंग यासाठी कोणतीही अडचण जाणवत नाही. मात्र उच्च दर्जाच्या गेमिंगची अपेक्षा असणाऱ्यांसाठी हा फोन नाही, त्याचा प्रोसेसर चांगला असला तर गेमिंगसाठी याहून अधिक बाबी आवश्यक असतात.

# कवयित्री आणि लेखिका शांता शेळके



## निमित्त

ख्यातनाम मराठी लेखिका, कवयित्री, अनुवादक व गीतकार अशी शांता जनार्दन शेळके यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी इंदापूर (जि. पुणे) येथे झाला. खेड, मंचर या परिसरात त्यांचे बालपण व्यतीत झाले. आज शांताबाईंचा स्मृतीदिन आहे.


शांताबाईंचे आजोबा (वडिलांचे वडील) अण्णा हे शाळामास्तर होते. शांताबाईंचे वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. त्यांच्या बदलीच्या नोकरीमुळे चिखलदरा, नांदगाव, खर्डी या गावातही शांताबाईंना वास्तव्य करावे लागले. त्यांच्या वडिलांना त्या दादा आणि आईला (अंबिका वहिनी) वहिनी म्हणत असत. एकूण ही पाच भावंडे त्यात शांताबाई सगळ्यात मोठ्या. आईच्या मृदू स्वभावाचे, तिच्या चित्रकलेचे, तिच्या वाचनवेडाचे संस्कार कळत–नकळत शांताबाईंवर होत राहिले. लहानपणी आजोळी गेल्यावर विविध पारंपरिक गीते, ओव्या, श्लोक त्यांच्या कानावर पडत. त्यामुळे कवितेची आवड, वाचनाची आवड, त्या संस्कारक्षम वयात रूजत गेली. १९३०मध्ये शांताबाईंच्या वडिलांचे निधन झाले त्या वेळी त्या नऊ वर्षांच्या होत्या. चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते.

यानंतर सारेजण पुण्याला काकांकडे आली. अखेर पुढील शालेय शिक्षण पुण्याच्या हुजुरपागेत झाले. सुसंस्कृत सुविद्य, अभिजात अशा या शाळेतील वातावरणाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. १९३८मध्ये त्या मॅट्रीक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बीए झाल्या. प्रा. श्री. म. माटे, प्रा. के. ना. वाटवे, प्रा. रा. श्री. जोग यांच्यामुळे अभ्यासाच्या पुस्तकाव्यतिरिक्त अवांतर वाचनाची, कवितेची गोडीही वाढत राहिली. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख, लिहू लागल्या. बीए झाल्याबरोबर मुक्ता आणि इतर गोष्टी नावाचा त्यांचा एक कथासंग्रहही निघाला. याला प्रा. माटेसरांनी प्रस्तावना लिहिली. १९४४मध्ये संस्कृत घेऊन शांताबाई एमए झाल्या. या परीक्षेत त्यांना तात्यासाहेब केळकर सुवर्णपदक मिळाले. एमए झाल्यावर सुरुवातीला त्यांनी आचार्य अत्रे यांच्या समीक्षक मासिकात, नंतर नवयुग या अत्र्यांच्या साप्ताहिकात आणि दैनिक मराठात दोनतीन वर्षे काम केले. विविध प्रकारच्या लेखनाच्या अनुभवाची शिदोरी त्यांना येथे मिळाली. अनेक साहित्याविषयक गोष्टी त्यांना इथे शिकायला मिळाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रूईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

विविध साहित्यप्रकारात विहार करूनही त्यांच पहिलं व खरं प्रेम राहिलं ते कवितेवरच. हळूवार भावकवितेपासून नाट्यगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते, चित्रपटगीते, प्रासंगिक गीते अशा विविध रूपातून त्यांची कविता आपल्याला भेटत असते. विविध पुरस्कार त्यांना लाभले आहेत. त्याबरोबरच १९९६मध्ये आळंदी येथे भरलेल्या ६९व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. ६ जून २००२ रोजी त्या निवर्तल्या, पण आजही त्यांची आठवण काढली जाते.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





# आरोग्य प्रहर

## निरोगी तरुणांमध्ये अचानक गंभीर आजारांचे प्रमाण का वाढलंय?

गेल्या अनेक वर्षांपासून तरुणांना गंभीर आजारांविरुद्धची एक नैसर्गिक आणि मजबूत ढाल मानले जात होते. नियमित व्यायाम करणारे, वजन नियंत्रणात ठेवणारे आणि कोणतीही व्यसन न करणारे तरुण आरोग्याच्या दृष्टीने पूर्णपणे सुरक्षित असल्याचा अनेकांना समज होता. आता मात्र भारतातील शहरी भागांमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांना अत्यंत चिंताजनक बदल पाहायला मिळत आहे. विशी आणि तिशीतील तरुण वरकरणी पूर्णपणे तंदुरुस्त दिसत असले तरी त्यांच्या शरीराच्या अंतर्गत भागात 'सायलेंट किलर' आजार वेगाने बळावत असल्याचे समोर आले आहे.




बदलत्या शहरी जीवनशैलीमुळे आरोग्याच्या दीर्घकालीन समस्या दिवसेंदिवस वाढतच असल्याचे समोर आले आहे. दैनंदिन कामाचा ताण, शैक्षणिक दबाव, आर्थिक चिंता आणि समाजमाध्यमांवरील सततच्या तुलनात्मक सवयींमुळे शरीर दीर्घकाळ तणावाखाली राहते. त्यामुळे हार्मोन्सचे संतुलन बिघडते आणि रक्तदाब वाढण्याचा धोका निर्माण होतो. त्याचवेळी बैठी जीवनशैली हृदय व रक्तवाहिन्यांचे आरोग्य आणि चयापचय प्रक्रियेला कमकुवत करत आहे. तासन्तास एकाच जागी बसून काम करणे, स्क्रीनसमोर जास्त वेळ घालवणे आणि कमी हालचाली करणे, यामुळे अनेक निरोगी तरुण नियमित व्यायाम करूनही प्रत्यक्षात शारीरिकदृष्ट्या निष्क्रिय राहत आहेत. हार्ले ऑफ लंडन इंडियाच्या होलिस्टिक मेडिसिन एक्स्पर्ट डॉ. रिधी सोनी यांच्या मते, भारतातील बदलत्या खाद्यसंस्कृतीने तरुण पिढीच्या पोषण पद्धतीला पूर्णपणे बदलून टाकले आहे. शहरी भागातील तरुण खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे स्वतःला गंभीर आजारांच्या खाईत ढकलत आहेत. चिंताजनक बाब म्हणजे, जोपर्यंत शरीराचे नुकसान होत नाही, तोपर्यंत बहुतेक तरुणांना या चुकीच्या सवयींची अजिबात जाणीव होत नाही.

डॉ. योगेश नैन यांनी या आजारांपासून बचाव करण्यासाठी नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, पुरेशी झोप, नियमित शारीरिक हालचाल, तणाव नियंत्रण आणि कुटुंबातील आजारांचा इतिहास जाणून घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. दरम्यान, डॉ. सोनी यांच्या मते, तरुणांनी आपल्या आहाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. आपण दररोज घेत असलेला आहार एकतर सर्वात शक्तिशाली औषध किंवा संथ विषही ठरू शकते. जुनाट आजार टाळायचे असतील तर शहरी भागात राहणाऱ्या व्यक्तींनी आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी पूर्णपणे बदलणे गरजेचे आहे.

# खोपोलीत प्लास्टिकमुक्तीसाठी पुढाकार

## कापडी पिशव्यांचे वाटप, मार्केटमध्ये वेंडिंग मशीन बसवणार




**खोपोली : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून खोपोली नगर परिषदेच्या वतीने प्लास्टिकमुक्त वातावरण निर्मितीसाठी शहरात जनजागृती उपक्रम राबवण्यात आला. वाढत्या प्लास्टिक प्रदूषणामुळे पर्यावरण, प्राणीजीवन व मानवी आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेता नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम केवळ प्रतीकात्मक न राहता नागरिकांना पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी मार्केट परिसरात वेंडिंग मशीनच्या माध्यमातून माफक दरात कापडी पिशव्या उपलब्ध करून देण्याचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे.

प्लास्टिक सहज नष्ट होत नसल्याने गटारे तुंबणे, जनावरांच्या आरोग्यावर परिणाम, माती व जलप्रदूषण वाढणे अशा समस्या निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांनी सवयींमध्ये बदल करत कापडी पिशव्यांचा स्वीकार करावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमात प्लास्टिक पिशव्या न वापरता कापडी पिशव्यांचा वापर करणाऱ्या नागरिकांचे स्वागत करून त्यांचे कौतुक करण्यात आले. नगराध्यक्ष कुलदीप शेंडे आणि मुख्याधिकारी पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. नागरिकांनीही प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यास प्राधान्य देण्याची भूमिका दर्शवली.

यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेवक संदीप पाटील, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील, इनरव्हील क्लब ऑफ खोपोलीची कार्यकारिणी, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत साठे, गुरुनाथ साठेलकर, स्वच्छता निरीक्षक गौतम मोरे, शिवा चिन्नास्वामी, शहर समन्वयक भक्ती साठेलकर आदींनी सहभाग घेतला. प्रशांत साठे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. "आज एक कापडी पिशवी स्वीकारली, तर उद्या पर्यावरणासाठी मोठे योगदान दिले", हा संदेश देणारा हा उपक्रम पर्यावरण संवर्धनाची नवी जाणीव निर्माण करणारा ठरला.

# रेवदंडा-साळाव पुलावर अपघातात एकाचा मृत्यू



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा-साळाव पुलावर शुक्रवारी रात्री ११.३० वाजता झालेल्या अपघातात एका सायकलस्वाराचा मृत्यू झाला. गणेश मिणमिणे (४१, साळाव) हे सायकलवरून जात असताना रेवदंडा बाजूकडून साळावच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या मोटारसायकलने त्यांना मागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की मिणमिणे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने अलिबाग शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

याप्रकरणी अर्जुन यादव (वय ५२, साळाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोटारसायकलस्वार मुकुंद चवरकर (वय २६, निडी) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेची माहिती मिळताच रेवदंडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण व इतर बाबींचा पुढील तपास पोलीस करत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे साळाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून रेवदंडा-साळाव पुलावरील वाहतूक सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## सानियो स्टील कंपनीत पर्यावरण दिन उत्साहात ; पर्यावरण रक्षणाची शपथ



**चौक : प्रतिनिधी**

जगदीशनगर येथील सानियो स्पेशल स्टील मॅन्युफॅक्चरिंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप पाचपांडे, ईडी तोमहिको ओगुरा, सीओओ तेत्सुया हासेगावा, एचआर व्हॉइस प्रेसिडेंट व फॅक्टरी मॅनेजर तान्हाजी पाठारे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, कामगार व कर्मचारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

व्यवस्थापकीय संचालक दिलीप पाचपांडे यांनी यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनाची थीम 'निसर्गाकडून प्रेरणा, हवामानाची, आपल्या भविष्यासाठी' विषयावर मार्गदर्शन केले. कंपनी पर्यावरण संवर्धनासाठी करत असलेल्या उपाययोजनांची माहिती देताना त्यांनी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून संगोपन करावे व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन केले. एचआर व्हॉइस प्रेसिडेंट व फॅक्टरी मॅनेजर तान्हाजी पाठारे यांनी उपस्थितांना पर्यावरण रक्षणाची शपथ दिली. तसेच कंपनी परिसरात जास्तीत जास्त वृक्षारोपण करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

कंपनीचे सेफ्टी अधिकारी प्रशांत जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी त्यांनी जागतिक तापमानवाढीची कारणे व त्यावर करायच्या उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ईएचएस विभागाचे पवार, शैलेश थरकुडे, यतीन दगडे, एचआर विभागाचे प्रकाश बाणे, प्रविण देशमुख, ॲडमिन विभागाचे कमलेश तळेकर तसेच सुरक्षा व बगीचा विभागाचे रामदास कळसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पेणमध्ये पर्यावरण दिन, वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षारोपण

**पेण : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिन तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पेणचे अध्यक्ष विनायक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उंबर्डे येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

पर्यावरणाचे महत्त्व स्पष्ट करताना निवृत्ती पाटील यांनी वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलनावर मात करण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे सांगितले. नागरिकांनी अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ व पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी पर्यावरण रक्षणाची सामूहिक शपथ घेऊन परिसर हिरवागार करण्याचा संकल्प केला. विनायक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत झाले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला.



## काशीद समुद्रकिनारी स्वच्छता व वृक्षारोपण






**मुरूड : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त काशीद येथे आदित ग्लोबल इंफ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. पुणे यांच्या वतीने स्वच्छता व वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्यात आला. काशीद ग्रामपंचायतचे सरपंच संतोष राणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व वृक्ष लागवड करून या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेत कंपनीचे ३०० कर्मचारी सहभागी झाले होते. प्रत्येकाने डोक्यावर टोपी व हातात झाडू घेऊन काशीद समुद्रकिनारा, वाहन पार्किंग झोन व आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला.

स्वच्छता मोहिमेतून हजारो किलो कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. समुद्रकिनारी शेकडो विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवडही करण्यात आली.यावेळी संचालक रोहित कड, काशिनाथ बोरसे, प्रकल्प व्यवस्थापक ज्ञानेश्वर ठोंबरे, ग्रामपंचायत अधिकारी सुशांत ठाकूर, जाफर, अविनाश सिंग, सतीश चव्हाण, सुदीप यादव, चंद्रशेखर सिंह, अतिश कासार, राकेश कासार, सामाजिक कार्यकर्ते निलेश दिवेकर, ग्रामपंचायत कर्मचारी प्रशांत खेडेकर आदी उपस्थित होते.

## माणगावच्या प्रणव शिर्केचे दुहेरी यश

**माणगाव : प्रतिनिधी**

जिद्द, मेहनत आणि इच्छाशक्तीच्या बळावर माणगाव येथील वाकडाईनगरमधील प्रणव संदीप शिर्के याने वयाच्या २० व्या वर्षी इंडियन आर्मी आणि मुंबई कारागृह पोलीस दल अशा दोन्ही ठिकाणी एकाचवेळी निवड मिळवून परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. प्रणवचे वडील रिक्षाचालक आहेत. त्यांनी अनेक वर्षे रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत मुलांना शिक्षण दिले. आईवडिलांची मेहनत लक्षात घेऊन प्रणवने जिजाऊ सामाजिक संस्थेतून आर्मी व पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेतले. कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या बळावर त्याने दोन्ही भरती परीक्षांमध्ये यश मिळवले.

## माणगाव परिसरात बियाणे पेरणीला सुरुवात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरासह पंचक्रोशी भागांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून शेतकरी शेतात बियाणे पेरणीचे काम सुरू करताना दिसत आहेत. पावसाचे आगमन जवळ आल्याने अनेक ठिकाणी शेतात मशागतीची कामे पूर्ण करून बियाणे व खतांची जुळवाजुळव करण्यात शेतकरी व्यस्त आहेत.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे मोहो, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १३२/६ | ०-१४-०० | २.८७ | श्री. शंकर गणू म्हात्रे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **२१ दिवसांच्या** आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०५/०६/२०२६.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक मुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. क्र. : ९९३०३६९८६१



### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविणेत येते की, मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र ए. गुंठे | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| पनवेल ता. पनवेल | ३३५ | १ | ०२-१० <br> ००-१८ <br> ०२-२८ | १०.३ |

सध्याचा अंतीम भूखंड क्रमांक टी. पी. स्कीम ४१३ / २ /अ, क्षेत्र ५४४८ चौ. मी. असा आहे.

सदरहु मिळकती संदर्भात आम्ही १) श्री. परशुराम गंगाराम भगत, २) श्री. रोहन सुरेश भगत, ३) श्री. सचीन सुरेश भगत, ४) श्रीमती नेहा नरेंद्र पाटील, ५) श्रीमती प्रमीला गुरूनाथ चिखलेकर, ६) श्रीमती जोत्स्ना नितीन घरत, ७) श्रीमती सुगंधा दत्तात्रेय ढवळे, ८) श्रीमती सुलोचना तुकाराम पाटील, (वादी) यांनी १) मेसर्स कांडपिळे थिएटर्स तर्फे भागीदार i) सुभाष राजाराम कांडपिळे, ii) दिपक जगन्नाथ कांडपिळे, iii) अजय यशवंत कांडपिळे, iv) अमेय अशोक कांडपिळे, २) निलसिध्दी लाईफ स्पेसर्स एल.एल.पी तर्फे श्री विलास मदनलाल कोठारी, (प्र. वादी ) यांच्या विरूध्द पनवेल येथील दिवाणी न्यायालयात रे. मु. क. १८१/२०२५ हा दावा ठरावाकरीता, निरंतरचे ताकीदीकरीता व कोर्टाचे अधिकारा करीता. स्पेसिफीक रीलीफ ॲक्ट कलम ३४ व ३८ नुसार. दाखल केलेला असुन सदरचा दावा मे. कोर्टात प्रलंबित आहे.

परंतु सदरहू दावा प्रलंबित असताना व सदरहु दाव्याची माहीती विरूध्द प्र. वादींस असताना देखील प्र.वादी निलसिध्दी लाईफ स्पेसर्स एल.एल.पी तर्फे श्री विलास मदनलाल कोठारी, यांनी सदर मिळकतीमध्ये इमारतीचे बांधकाम सुरू केलेले आहे.

तरी सदरचे नोटीसने कळविणेत येते की, सदर इमारतीमधील सदनिकांबाबत निलसिध्दी लाईफ स्पेसर्स एल. एल.पी तर्फे श्री विलास मदनलाल कोठारी, यांचे बरोबर कोणताही आर्थीक व खरेदी व्यवहार करू नये अशा प्रकारे कोणताही व्यवहार केल्यास तो खाली सही करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही हयाची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०६/२०२६

सही/-
**ॲड.किशोर मधुकर हजारे.**
(बी.कॉम. एल.एल.बी )

००१, वैद्यबाग, कामत गल्ली, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.
फोन (कार्या.) (२१४१) २२७२७१. मो. ९८५०००९९५०
Email ID : advkishorhajare@gmail.com



### जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे व खालील मिळकतीच्या विदयमान मालकांनी त्यांच्या खालील परिशिष्ठात वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकी हक्कांबाबत खात्री दिली आहे व सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याबद्दलची तसेच त्यांना पणन योग्य हक्क (मार्केटेबल टायटल)असल्याबद्दलची खात्री दिली आहे. तरी सदर जमीन मिळकतीवर अन्य कोणाचाही, कोणत्त्याही प्रकारचा मालकी हक्क हितसंबंध उदा. गहाण, दान, पोटगी, चार्ज, लिज, कोर्ट डिकी, कोर्टात वादाचा विषय, भाडेकरू हक्क, कुळ, ताबा वहिवाट लायसन्स, वारसा हक्क, कर्ज, बोजा, करार, मदार, मुखत्यारपत्र, अक्षर अन्य कोणत्त्याही प्रकारे, हक्क, हितसंबंध व मालकी अधिकार असल्यास. त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कागदपत्रे व त्यांच्या सत्त्यप्रतीसह लेखी हरकत नोंदवुन आमची खात्री पटवुन द्यावी . वरील कोणाचीही हरकत न आल्यास सदरील जमीन मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी व बोजारहित आहे व त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचाही कोणत्त्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक समजुन उमजुन सोडुन दिलेला आहे. असे समजण्यात येईल व नंतर कोणाचीही हरकत / तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : गाव -धारणी, तालुका-खालापूर, जिल्हा - रायगड.**

| क्र. | नाव | गट क्र. | क्षेत्रफळ हे. | क्षेत्रफळ आर.चौमी | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव प्रभाकर झेंडे वगैरे | १२/३/अ/१ | ०० | ६७.४० | २ | ०० |
| २ | श्री. प्रमोद वसंतराव बाबर | २/१२ | ०० | २०.०० | १ | २८ |

ठिकाण : खालापूर
दिनांक : ०५/०६/२०२६

सही/-
**दिप्ती जगदीश पाटील**
वकील

पत्ता : रियल टेक पार्क, ऑफिस नं. ११०९/१०, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई. मोबाईल ९०२८५६५२६०.





# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबईत वृक्षारोपण

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते नेरूळ आणि बेलापूर येथे वृक्षारोपण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शिरवणे विद्यालय व बेलापूर जेट्टी सेक्टर १५ येथे आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

नेरूळ येथील शिरवणे विद्यालयामध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकवर्ग तसेच स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



तसेच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बेलापूर जेट्टी सेक्टर १५ येथील दशविधी क्रिया येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. "वृक्ष लावूनिया सारी, बनवू नवी मुंबईला निसर्गाची पंढरी" या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन आणि हरित नवी मुंबईच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, "एक वृक्ष म्हणजे हजारो श्वासांचा आधार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना निरोगी व सुरक्षित भविष्य देण्यासाठी प्रत्येकाने आपल्या अंगणात आई वडिलांच्या नावाने एक तरी वृक्ष लावून त्याचे जतन करावे व वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही स्वीकारावी असे सांगून नवी मुंबईत ५००० व रायगड येथे २००० झाडे लावण्याचा संकल्प आमदार मंदा म्हात्रे यांनी केला.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक तथा भाजपा नेते निलेश म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते गोपाळराव गायकवाड, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, दिवाळे ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, हरियाणा वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष बलबीर सिंग चौधरी, भूषण कोळी, निलेश पाटील, मनोज म्हात्रे, दर्शन भारद्वाज, जयदेव ठाकूर, अजय वर्मा, जयसिंग पवार, कल्पेश कुंभार, चंद्रकांत पाटील, मणी कोणार यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाशीत "एक झाड आईच्या नावाने"उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धन

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "एक झाड आईच्या नावाने" या अभियानाअंतर्गत सेक्टर-३०, वाशी येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून वृक्षारोपण केले.



या कार्यक्रमाला नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, नगरसेवक सुनील कुरकुटे, नगरसेवक भाऊ भापकर, नगरसेविका प्रिती संदीप भगत, परिवहन समिती सदस्य राजेश राय, माजी नगरसेविका फशीबाई भगत, समाजसेवक अनिल म्हात्रे, राजेश ठाकूर, उज्ज्वला जगताप, रजनी लाखोटिया, शशी नेगी, सुजाता सैनी, सुभाष विश्वकर्मा, अरविंद उपाध्याय, अतुल तिवारी, सतीश सिंह, भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष सुभाष गायकवाड, प्रदेश कार्यालय मंत्री सुरेश गायकवाड, रमेश मुळे, सुधीर आंग्रे, हरदीप सैनी, शाम सुर्वे, कांता जाधव यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संरक्षण, हरित नवी मुंबई आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण करण्याचा संकल्प केला.

# दोन महिन्यांत सुधारणा न झाल्यास तीव्र जनआंदोलनाचा इशारा

## भाजप नगरसेवक गणेश सकपाळ आक्रमक

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली गाव, तळवली गाव, सेक्टर २१, सेक्टर २२ तसेच संपूर्ण घणसोली विभागात वारंवार कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. अनेक वेळा ८ ते १० तास तर काही प्रसंगी तब्बल २४ तासांपर्यंत वीजपुरवठा खंडित राहत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत आहे.

या पार्श्वभूमीवर घणसोली विभाग कार्यालयात महावितरण अधिकाऱ्यांसोबत आयोजित बैठकीत भाजपाचे नगरसेवक गणेश सकपाळ यांनी महावितरणच्या कारभारावर जोरदार टीका करत नागरिकांच्या वतीने आक्रमक भूमिका घेतली.बैठकीस प्रभाग समिती सभापती ललिता मढवी, ज्येष्ठ नगरसेवक लक्ष्मीकांत पाटील, नगरसेविका अंजना म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी नागरिकांनी घणसोली परिसरातील गंभीर विद्युत समस्यांचा पाढाच महावितरण अधिकाऱ्यांसमोर वाचला. विशेष म्हणजे कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक वीजपुरवठा खंडित होणे, तक्रारींचे निराकरण न होणे, फोन कॉलला प्रतिसाद न मिळणे, तक्रार क्रमांक न देणे, अपुरे मनुष्यबळ, वारंवार बिघाड होणारे ट्रान्सफॉर्मर, नादुरुस्त फिडर पिलर, जीर्ण झालेल्या केबल्स आणि निकृष्ट दर्जाची विद्युत यंत्रणा यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

यावेळी नगरसेवक गणेश सकपाळ यांनी महावितरण प्रशासनास स्पष्ट शब्दांत सुनावले की, ग्राहकांकडून नियमितपणे वीजबिल, विविध आकारणी व अधिभार वसूल केले जातात; मात्र त्याबदल्यात दर्जेदार, सुरक्षित आणि अखंडित सेवा मिळत नसेल तर ते ग्राहकांच्या अधिकारांचे उल्लंघन आहे. ग्राहकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणे, तक्रार क्रमांक न देणे, वेळेत सेवा न देणे आणि वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा याबाबत संबंधित नियमावली, सेवा हमी तत्त्वे आणि ग्राहकांच्या संरक्षणाशी संबंधित तरतुदींचा विचार करणे आवश्यक आहे.महावितरणने बैठकीत दिलेल्या आश्वासनानुसार पुढील दोन महिन्यांत नवीन ट्रान्सफॉर्मर, फिडर पिलर, केबल्स, मनुष्यबळ आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून वीजपुरवठा सुरळीत केला नाही, तर घणसोलीतील नागरिकांसोबत व्यापक आंदोलन छेडले जाईल असा इशारा त्यांनी दिला.

> **"घणसोली परिसरातील वीज ग्राहकांच्या समस्या पुढील दोन महिन्यांत टप्प्याटप्प्याने सोडविण्यात येतील. आवश्यक कामांना प्राधान्य देऊन युद्धपातळीवर कार्यवाही करण्यात येईल."**
>
> **- अजय भसाखेत्रे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण**



# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मॉडर्न स्कूलमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

५ जून २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विदर्भ सिंधू फाउंडेशनच्या वतीने मॉडर्न स्कूलच्या प्रांगणात विविध वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला मॉडर्न स्कूलचे विद्यार्थी, शिक्षक तसेच विदर्भ सिंधू फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा हिवाळे व संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना अध्यक्षा अनुपमा हिवाळे यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व विशद करत पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष लागवड व संगोपनाची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच विद्यार्थ्यांसमवेत पर्यावरण संरक्षणाची शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले, पर्यवेक्षक आबासाहेब वाघ, हना सरेला, पंढरीनाथ माळी, मेघनाथ मढवी, अकिला शेट्टी तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली.



# मासळीला बाजारात मिळतोय सोन्याचा भाव

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील सागरी मत्स्यसंपत्तीचे संवर्धन आणि मासळीच्या प्रजनन काळाचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांवर बंदी लागू केली आहे. या निर्णयामुळे समुद्रातून होणारी मासळीची आवक मोठ्या प्रमाणात घटली असून बाजारात मासळीचे दर चांगलेच वाढले आहेत. परिणामी, मासे खवय्यांना आता आवडत्या माशांसाठी जादा पैसे मोजावे लागत आहेत.



सध्या बाजारात सुरमई तब्बल १,८०० रुपये किलो, काफरी पॉपलेट २,२०० रुपये किलो, घोळ २,००० रुपये किलो, पॉपलेट १,५०० रुपये किलो, हलवा १,००० रुपये किलो आणि कोळंबी ८०० रुपये किलो दराने विकली जात आहे. तर बागडे सहा नगांसाठी ४०० रुपये आणि बोंबील बारा नगांसाठी ३०० रुपये दराने विकले जात असल्याने सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ बसत आहे. यावेळी, अनेक खवय्यांकडून "म्हावऱ्याला आयलाय सोन्याचा भाव" अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

पावसाळ्यात ताज्या मासळीची उपलब्धता कमी होत असल्याने मागणी आणि पुरवठ्यातील तफावत वाढते आणि त्याचा थेट परिणाम दरांवर दिसून येतो. मात्र या बंदीमागे पर्यावरणीय आणि मत्स्यसंवर्धनाचा महत्त्वाचा हेतू आहे. पावसाळा हा विविध मासळी प्रजातींचा प्रजनन काळ असल्याने या काळात मोठ्या प्रमाणावर मासेमारी झाल्यास मत्स्यसंपत्तीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही ६१ दिवसांची मासेमारी बंदी लागू करण्यात आली आहे.

मासेमारी बंद असली तरी कोळी बांधवांसाठी हा काळ पूर्णपणे रिकामा नसतो. किनाऱ्यावर जाळी विणणे, फाटलेल्या जाळ्यांची दुरुस्ती, होड्यांची डागडुगी, रंगकाम, इंजिनांची देखभाल आणि नव्या हंगामाची तयारी अशी विविध कामे सुरू असतात. वर्षभर समुद्रात संघर्ष करणाऱ्या मच्छीमारांसाठी हा काळ आवश्यक देखभाल आणि नियोजनाचा मानला जातो.

तथापि, नियमित उत्पन्न बंद झाल्याने अनेक मच्छीमार कुटुंबांवर आर्थिक ताणही जाणवतो. त्यामुळे एकीकडे मत्स्यसंपत्तीचे संवर्धन आवश्यक असले तरी दुसरीकडे कोळी बांधवांच्या उपजीविकेचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा असून, समुद्राला विश्रांती, भविष्यासाठी गुंतवणूक मत्स्यतज्ज्ञांच्या मते, पावसाळी बंदीमुळे मासळीच्या प्रजननाला चालना मिळते आणि पुढील हंगामात मासळीचे उत्पादन वाढण्यास मदत होते. याचा दीर्घकालीन फायदा मच्छीमार, व्यापारी आणि ग्राहक या तिन्ही घटकांना होतो.

विशेष म्हणजे सध्या वाढलेल्या दरांमुळे खवय्यांचा हिरमोड होत आहे.

# चिरनेरच्या कुंभारवाड्यात आजही मातीच्या भांड्यांना शहरी भागातून मोठी मागणी

## कुंभार व्यवसायाला सुगीचे दिवस

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर गाव हे मूर्ती कलेबरोबर मातीच्या भांड्यांसाठीही प्रसिद्ध आहे. येथे कुंभार समाजाची लोकवस्ती असल्याने या समाजाचा पूर्वपरंपरागत मूळ व्यवसाय मूर्तीकला आणि मातीची भांडी तयार करण्याचा असल्यामुळे चिरनेर कुंभारपाडा हे मूर्तीकला आणि मातीची भांडी यासाठी प्रसिद्ध आहे. दरम्यान गेल्या काही वर्षापूर्वी लोकांनी संसार उपयोगी मातीची भांडी वापरण्याकडे पाठ फिरवली होती. त्यामुळे मातीची भांडी वापरण्याचे प्रमाणही कमी झाले होते. परंतु अलीकडे वाढते प्रदूषण आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा अतिरिक्त वापर यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा अनुभव लोकांना येऊ लागल्याने, पुन्हा एकदा अन्न शिजवण्यासाठी मातीच्या भांड्यांचा वापर होताना दिसू लागला आहे.

अनेक नागरिक मातीच्या भांड्यामध्ये स्वयंपाक करणे पसंत करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातूनही मोठ्या प्रमाणावर मातीच्या भांड्यांना मागणी वाढली आहे. त्यामुळे मातीची भांडी बनविणाऱ्या कुंभारकाम व्यवसाय कारागिरांना सुगीचे दिवस आले आहेत. पावसाळा जवळ आला तरीही मातीच्या भांड्यांची मागणी काही कमी होत नाही. त्यामुळे येथील कुंभार कारागिरांचा व्यवसाय



देखील चांगला वाढत आहे. मातीची भांडी आणि कुंभारकाम व्यवसायाला सुगीचे दिवस आले आहेत. त्यामुळे सध्या ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातील नागरिक देखील मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करणे पसंत करीत आहेत.

मातीच्या भांड्यामध्ये अन्न शिजवताना अन्नामध्ये असलेली पोषक तत्वे योग्य प्रमाणात राहतात. ती नष्ट होत नाहीत. त्यामुळे अन्नाची चव वाढते. शिवाय या अन्नाला विशिष्ट प्रकारच्या गोडव्याचा वास असतो. तर अल्युमिनियम किंवा स्टीलची भांडी वापरल्याने पोषक तत्वे नष्ट होतात. मातीची भांडी लवकर गरम होतात त्यामुळे इंधन वाचते. हे अन्न खाल्ल्याने पोटाच्या अनेक समस्यांना आराम मिळतो. मातीची भांड्यांना वाढती मागणी असल्यामुळे आमच्या कुंभार व्यवसायला व कारागिरांना रोजगार उपलब्ध होत आहे. येथील ग्रामीण भागाबरोबर नवीमुंबई, मुंबई येथील ग्राहक दरवर्षी कुंभार वाड्यात आवर्जून येऊन खापरी, तई, चुली, भीण,जोगळी, मडकी, लग्नातील नक्षीदार आयरी चांगल्या दराने खरेदी करतात.

## वाशीत वृक्षारोपण

**नवी मुंबई** : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी सकाळी कणकेश्वर नवग्रह मंदिर परिसर उद्यान, सेक्टर ७, वाशी, नवी मुंबई आणि मॉर्डन स्कूल वाशी येथे भारतीय जनता पार्टी वाशी मंडळाच्या वतीने मंडळ अध्यक्ष विकास सोरटे यांच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपण करण्यात आले होते.

यावेळी मॉर्डन स्कूल, वाशीच्या प्राचार्या सुमित्रा भोसले , शाळेतील शिक्षक व कर्मचारी वर्ग, विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. वाशी मंडळातील शामराव अलदर, मंगेश चव्हाण, जयंत पाटील, भरत मावळे, प्रवीण भगत, गणेश शिंदे, जेम्स आवारे,जिनेंद्र त्रिपाठी, विशाल साबळे, सुलभा धुरी,कल्पना छत्रे,सुगंधा शेलटकर, मालती सोनी, कविता कटकधोंड उपस्थित होते.

## ऐरोलीत अनधिकृत बांधकामविरोधी कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व मा. अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व संजय शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत घर क्रमांक १६६ एरोली ,नवी मुंबई येथे हितेश किशोर कोठकर यांनी अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. हितेश किशोर कोठकर घर क्रमांक १६६ऐरोलीगाव, नवी मुंबई यांनी



केलेल्या अनधिकृत बांधकामांस जी विभाग कार्यालयामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम साधना पाटील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, कनिष्ठ अभियंता यांच्या नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले.यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे असल्याचे सहाय्यक आयुक्त तथा वार्ड अधिकारी साधना पाटील यांनी सांगितले.

# रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील पाणीसाठा घटला

## रायगड पाटबंधारे विभागांतर्गत सरासरी २०.७२ टक्के पाणीसाठा उपलब्ध

**रोहा : प्रतिनिधी**

रायगडकर पावसाच्या प्रतीक्षेत असताना रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील पाणीसाठा घटले आहे.रायगड पाटबंधारे विभागा अंतर्गत येत असलेल्या जिल्ह्यात सरासरी २०.७२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.मागील वर्षी (२०२५ ) याच दिवशी २८.०६ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता.जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील फणसाड धरणाने तळ गाठले आहे तर जिल्ह्यात सर्वाधिक पाणीसाठा तळा तालुक्यातील वावा धरणक्षेत्रात ५३ टक्के एवढा आहे.


जिल्ह्यातील १० टक्के पेक्षा कमी पाणीसाठा असलेल्या अत्यल्प पाणीसाठा उपलब्ध असलेल्या धरणांमध्ये घोटवडे ४ टक्के, ढोकशेत २ टक्के, उन्हेरे ४ टक्के, रानीवली ८ टक्के, पाभरे ६ टक्के, बामणोली २ टक्के, पुनाडे ७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.जिल्ह्यातील ६ धरणक्षेत्रात १० ते २० टक्के दरम्यान पाणीसाठा उपलब्ध आहे



रायगड जिल्ह्यातील २८ धरण क्षेत्रातील पाणीसाठा पाहता यामध्ये मुरुड तालुक्यातील फणसाड धरणक्षेत्रात ० टक्के पाणीसाठा उपलब्ध,तळा तालुक्यातील वावा धरणक्षेत्रात ५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणक्षेत्रात ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध, पेण तालुक्यातील आंबेघर धरणक्षेत्रात ४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अलिबाग तालुक्यातील श्रीगांव धरणक्षेत्रात १२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणक्षेत्रात १२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, घोटवडे धरणक्षेत्रात ४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, ढोकशेत धरणक्षेत्रात २ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कवेळे धरणक्षेत्रात ११ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उन्हेरे धरणक्षेत्रात ४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणक्षेत्रात २८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कुडकी धरणक्षेत्रात २७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रानीवली धरणक्षेत्रात ८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणक्षेत्रात ६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, संदेरी धरणक्षेत्रात ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, महाड तालुक्यातील वरंध धरणक्षेत्रात २८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खिंडवाडी धरणक्षेत्रात २९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कोथुर्डे धरणक्षेत्रात २३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खैरे धरणक्षेत्रात २५ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरणक्षेत्रात १८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अवसरे धरणक्षेत्रात १७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खालापूर तालुक्यातील भिलवले धरणक्षेत्रात ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध, कलोते मोकाशी धरणक्षेत्रात २३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, डोणवत धरणक्षेत्रात १७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात ३८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, बामणोली धरणक्षेत्रात २ टक्के पाणीसाठा उपलब्ध,उसरण धरणक्षेत्रात ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध,उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात ७ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# आजीचा खून करून टाकलेले प्रेत आंबेनळी घाटातून हस्तगत





**पोलादपूर, अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील एका युवकाने स्वतःच्या सख्ख्या आजीचा खून करून तिचा मृतदेह आंबेनळी घाटात फेकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्यानंतर प्रतापगड आणि महाबळेश्वर रेस्क्यू टीमनी घेतलेल्या शोधानंतर पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातील १०० फूट खोल दरीतून आज्जीचे प्रेत हस्तगत करण्यात आल्याने कशेडी आणि आंबेनळी घाट 'किल ऍण्ड थ्रो'साठी कुप्रसिध्द होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अलिबाग तालुक्यातील तीनवीरा गावातील आदर्श शेडगे या ३२ वर्षीय संशयित युवकाने दागिन्यांच्या हव्यासापोटी दोन दिवसांपूर्वी सारळ गावातील स्वतःच्या सुनंदा पाटील या ८५ वर्षीय सख्ख्या आजीचा खून केला. या गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याने आजीचा मृतदेह आंबेनळी घाटातील पोलादपूर तालुक्याच्या हद्दीतील 'बावली टोक' ते 'दाभिळटोक' दरम्यान असलेल्या खोल दरीमध्ये फेकून दिले. अलिबाग पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करत संशयित युवकाला ताब्यात घेतले. पोलिसांच्या कडक चौकशी दरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि मृतदेह फेकलेले ठिकाण दाखवले. यानंतर अलिबाग पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

४ जून रोजी सकाळी साडेआठच्या दरम्यान प्रतापगड सर्च एँड रेस्क्यू टीमचे सदस्य अजित जाधव यांना पोलादपूर पोलीस स्टेशनमधून फोन आला. घटनेचे गांभीर्य ओळखून महाबळेश्वर ट्रॅकर्स आणि प्रतापगड सर्च एँड रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी तात्काळ आपले साहित्य जमा केले आणि ते आंबेनळी घाटाच्या दिशेने रवाना झाले. सुरूवातीला आरोपीने मृतदेह नक्की कुठे टाकला आहे, याबाबत निश्चित ठिकाण कोणालाही माहिती नव्हते. त्यामुळे टीमने घाटामधून दरीमध्ये शोध घेण्यास सुरुवात केली. सुमारे दीड-एक तासांच्या अथक शोधानंतर १०० फूट खोल दरीमध्ये एका काळया रंगाच्या पिशवीमध्ये मृतदेह आढळून आला.

आंबेनळी घाटातील पोलादपूर तालुक्यातील 'बावली टोक' ते 'दाभिळटोक' दरम्यानच्या धोकादायक कडेकपारी आणि खोल दरीमध्ये असलेला मृतदेह बाहेर काढणे हे आव्हानात्मक होते. प्रतापगड आणि महाबळेश्वर रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी आपसातील समन्वयाने लगेचच रोप आणि इतर साहित्याचा मांडणी करून दरीमध्ये उतरायला सुरुवात केली. या दरम्यान पावसाने हजेरी लावल्याने अडचणी निर्माण झाल्या सुमारे एक तासाच्या कठोर परीश्रमानंतर दोन्ही टीमच्या सदस्यांना आजीचा मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात यश आले.

या धाडसी रेस्क्यू मोहिमेमध्ये सुनीलबाबा भाटिया, अनिल केळगणे, जयवंत बिरामणे, ऋषिकेश जाधव, अजित जाधव, मुन्ना उतेकर, ओमकार सोनवणे, शरद सावंत, निखिल सावंत, आणि संकेत सावंत या दोन्ही टीमच्या सदस्यांनी मोलाचे योगदान दिले.

अशा अनेक घटना कशेडी आणि आंबेनळी घाटांमध्ये झाल्याने 'किल ऍण्ड थ्रो'साठी कुप्रसिध्द होत असल्याचे दिसून येत आहे. या घटनांतील काही गुन्ह्यांची उकल करणे पोलीसांना अशक्यप्राय असून अलिबागच्या नातवाला संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आल्यामुळे त्याने दिलेल्या माहितीमुळे हा गुन्हा उघडकीस आल्याचे मानले जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिन साजरा

**माणगाव : बातमीदार**

कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कुलसचिव डॉ. अमित शेष यांच्या शुभहस्ते तसेच विद्यापीठ अधिष्ठाता डॉ. एस एल नलबलवार,डॉ. एस एम पोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.



वृक्षारोपण व जनजागृती मोहिमेचा शुभारंभदिनांक ५ जून रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (DBATU), लोणेरे येथे 'जागतिक पर्यावरण दिन' अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावर्षी विद्यापीठाने "पर्यावरण रक्षणाचे व्रत, समृद्ध भविष्याचा मार्ग" हे मुख्य ब्रीदवाक्य समोर ठेवून संपूर्ण कॅम्पसमध्ये पर्यावरण दिनांनिमित्तसुमारे 200 झाडांची लागवड करण्यात आली तसेच ५०० सीड्सबॉल्स ( बिजगोळे) परिसरात विखुरण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरणाचा ढासळणारा समतोल रोखण्यासाठी भावी पिढीला हरित व सुरक्षित भविष्य देण्यासाठी प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे अधोरेखित केले.

# कोथर्डे धरणाचा पाणीसाठा आटल्याने मगरींचा आजूबाजूच्या गावांमध्ये संचार

**महाड : प्रतिनिधी**

कोथुर्डे धरणातील पाणी आटल्यामुळे ७०ते ८० मगरी आजूबाजूच्या परिसरातील कोथुर्डे गाव, धरणाची वाडी, गावलवाडी ,आदिवासी वाडी ,अधिवस्त्यांमध्ये संचार करताना निदर्शनात आल्या. मगरींच्या या संचारामुळे आजूबाजूच्या गावातील नागरिकांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली आहे. सागर मिस्त्री यांच्या नेतृत्वाखाली सिस्केप या संस्थेतील कार्यकर्त्यांनी या मगरीची यशस्वी रेस्क्यू करून त्यांना मूळ रहीवासात सोडून दिले आहे.

दिनांक ४ जून रोजी रात्री साडे अकरा वाजे सुमारास एक दहा ते अकरा फुटी मगर कोथरूड गावाकडे मूळ रस्त्याकडून येताना गावकऱ्यास निदर्शनात आली. त्यांनी तात्काळ सिस्केप संस्थेबरोबर संपर्क साधला आणि सदर धोका असल्याचे निदर्शनास आणून दिले. धरणातील जवळपास २७ मगरी या गाव परिसरात गावकऱ्यांना आज दिसून आल्या. पाणी आटल्यामुळे आणि अति उष्णतेमुळे त्या जंगलाकडे, दाट झाडातील गारवा, करवंदीच्या गारव्यासाठी स्थलांतरित होताना दिसत आहेत. असे मत चिंतन वैष्णव आणि योगेश गुरव या सदस्यांनी व्यक्त केले .

रात्री महाड वनक्षेत्रपाल वनपरिक्षेत्र कार्यालय वन अधिकारी आशिष पाटील यांच्या परवानगीने तसेच बेटाचे वन शिपाई सुनील घोलप यांच्या सूचनेनुसार सिस्केप सदस्य चिंतन वैष्णव, योगेश गुरव, चिराग मेहता, साहिल पानवकर,धर्मेश मेहता, ओम शिंदे, ओंकार वेलणकर, आनंद शेलार,ओंकार माने,परीक्षित चिमणकर आदी सर्वजण मगर पकडण्याचा रॉड क्रोकोडाइल



पोल आवश्यक असलेले साहित्य रेस्क्यू बॅग वगैरे घेऊन घटनास्थळी पोहोचले. पाच फुटी एक व तीन फुटी एक मगर अशा छोट्या मगरी पकडून त्यांनी जवळच्या पाण्यात

### सिस्केप कडून मगरींचे यशस्वी रेस्क्यू

सोडून दिल्या. पण दहा ते अकरा फुटी अजस्त्र मगर पकडताना ज्यावेळी त्याच्या तोंडामध्ये क्रोकोडाइल पोल या साहित्याने फास् टाकण्यात आला त्यावेळी त्या मगरीने एका झटक्यामध्ये तो फास् तोडून पळ काढला. काही सेकंदात ती जंगलाच्या काळोखा मध्ये दिसेनाशी झाली. हे शोध कार्य आणि रेस्क्यू ऑपरेशन पहाटे साडेचार पर्यंत चालू राहिले.

त्यानंतर सकाळी साडेआठ वाजता गावकऱ्यांच्या निदर्शनात ही ११ फुटी मगर पुन्हा आली आणि पुन्हा रेस्क्यू टीम पुन्हा घटनास्थळी आज रवाना झाली. त्या मगरीला दोरखंडाने बांधले. गावकऱ्यांच्या माहितीनुसार आणि सिस्केप संस्थेच्या सर्वेक्षणानुसार जवळपास ७० ते १००मगरी या धरण परिसरामध्ये आहेत. तर दीड फुटापासून ते तीन फुटापर्यंत यावेळी त्यांनी मगरीची पिल्ले देखील पहिल्यांदाच दिसून आली आहेत. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सध्या होऊ घातलेल्या दोन दिवसीय शिवराज्याभिषेक सोहळ्यानंतर वनविभागातर्फे एक बैठक लवकरच बोलवण्यात येणार आहे. अशी माहिती सिस्केपचे प्रेमसागर मेस्त्री यांनी दिली आहे. मगरींविषयी सावित्री नदीतील सद्यस्थिती तसेच आजूबाजूच्या धरणाच्या परिसरातील त्यांचे धोक्यात आलेले वास्तव्य याविषयी युद्ध पातळीवर निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपकडून वाशी येथे वृक्षारोपण

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश स्तरावर राबविण्यात येणाऱ्या "एक पेड माँ के नाम" या अभियानांतर्गत रोहा तालुका भाजपाच्या वतीने वाशी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील तथा जिल्हा महामंत्री सतीश धारप यांच्या सूचनेनुसार आणि रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांच्या नियोजनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. शुक्रवार, दि. ५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी



उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

या प्रसंगी रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग, भाजपा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष नरेश कोकरे, नगरसेवक रोशन चाफेकर, रायगड भाजपा जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, वैभव कुलकर्णी, धर्मा कोकरे, रोहा तालुका युवा मोर्चा महिला अध्यक्षा रिया कासार, सुरेखा कदम, उपाध्यक्ष अदिती शिंदे, भाजपा नेत्या जयश्री भांड, तालुका सरचिटणीस सायली बामणे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी अमित घाग म्हणाले, "पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'एक पेड माँ के नाम' या अभियानातून प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या नावाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. वृक्ष लागवड ही केवळ एक दिवसाची कृती नसून त्याचे जतन व संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याने सर्वांनी सहभागी व्हावे."

# मुरूड एसटी आगाराविरोधात तहसीलदारांना निवेदन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा एसटी आगारातील नादुरुस्त असलेली एसटी बसेस तात्काळ कायम स्वरुपी बंद करण्यासाठी मुरूड जनतेचा आक्रोश थेट राज्याचे परिवहन मंत्री यांना लेखी निवेदनाची प्रत मुरूड तहसीलदार आदेश डफळ यांना देण्यात आले.



यावेळी जनतेच्या वतीने नगरसेवक ॲड. रुपेश पाटील यांनी एसटी बसेस ची दुरावस्था या संदर्भात तहसीलदार आदेश डफळ यांच्या कडे समस्या मांडण्यात आल्या.व या संदर्भात तात्काळ बैठक बोलवावी त्या बैठकीत रायगड विभागीय नियंत्रक डॉ.सुहास चौरे यांना आमंत्रित करावे अशी विनंती तहसीलदार यांच्या कडे जनतेच्या वतीने नगरसेवक ॲड.रुपेश पाटील यांनी केली.

यावेळी नगरसेवक ॲड. रुपेश पाटील,ललीत(धग्या) जैन,कुणाल सतविडकर,जाहिद फकजी, जनार्दन कंधारे,भारत रांजणकर, राजेंद्र कजबजे,,अनंत जोशी, सुशील ठाकुर,अजित गुरव,अजित कासार,विशाल कोलवणकर,उमेश भोईर, मॉन्टी दांडेकर,महेश मानकर, स्वप्निल कवळे उपस्थित होते.

निवेदनात एसटी आगारातील एसटी बसेस रोज रस्त्यात बंद पडत आहेत. जनतेला अतिशय वाईट दर्जाची सुविधा मुरुड मधील नागरिकांना देण्यात येत असुन या बससेवेसाठी वापरण्यात येणाऱ्या गाड्या पुर्ण पणे नादुरुस्त असुन सतत काहीना काही विपरीत परिणाम त्यांचे दिसुन येत आहेत.मागील काही दिवसांत गाडी रस्त्यात बंद पडणे वाहनांचे चाक निखळुन पडणे फाटलेला टायर गाडीस लावणे ,चालक वाहक उपलब्ध नसणे वाहन कधीच वेळेवर न सुटणे अश्या अनेक समस्यांने मुरूड आगारास व्यापलेले आहे.

याबाबत समाजातील अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या त्याबाबत केवळ आश्वासन मिळालेले असुन कारवाई मात्र शुन्य आहे.कदाचित भविष्यात यांचा विपरीत परिणाम म्हणून जनतेमध्ये असंतोष निर्माण होण्याची व सदरचा बिनकामाचा डेपो बंद करण्यासाठी कायदा हातात घेण्याची वेळ जनतेवर येण्याची शक्यता आता अधिक निर्माण झाली आहे.त्यात मुरूड अलिबाग रस्त्याची आधीच दयनीय अवस्था असुन त्याकरिता होणारा त्रास आणि वेळेचा अपव्यय आपल्याला माहीती आहेच.

तसेच येणारा काळ पावसाळ्याचा असुन सदरची परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता आहे.थोड्याच दिवसांत शाळा सुरू होणार असून या एसटी बस सेवेवर ग्रामीण भागातील जनता व विद्यार्थी अवलंबून असुन यांची संख्या सुध्दा अधिक आहे.याही बाबींचा आपण गांभीर्याने विचार करावा व मुरुड मधील सर्वात जास्त गंभीर व सतत वाढत चाललेल्या समस्येचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकारी यांना आपल्या दालनात बोलवुन जनतेचा समक्ष बैठक आयोजित करावी.अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आत्मपरीक्षणाची गरज

**माणगाव : बातमीदार**

दरवर्षी ५ जून हा दिवस "जागतिक पर्यावरण दिन" म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. विविध ठिकाणी वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा, जनजागृती कार्यक्रम आणि पर्यावरण संरक्षणाच्या घोषणा दिल्या जातात. मात्र, या सर्व उपक्रमांपलीकडे जाऊन आपण प्रत्यक्ष जीवनात पर्यावरणपूरक वर्तन करतो का, हा खरा प्रश्न आहे.

आज निसर्गाचे संतुलन मोठ्या प्रमाणात बिघडले आहे आणि त्याला सर्वाधिक जबाबदार आपण मानवच आहोत. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिकचा वापर सर्वत्र दिसून येतो. टूथपेस्टच्या ट्यूबपासून, साबणाच्या वेष्टनांपासून, बिस्किटांच्या पाकिटांपासून ते चहाच्या कपांपर्यंत, बाजारातील खरेदीपासून किराणा सामानाच्या पिशव्यांपर्यंत सर्वत्र प्लास्टिकचा अनियंत्रित वापर होत आहे. धान्याच्या पारंपरिक सुती किंवा तागाच्या पोत्यांऐवजी आता प्लास्टिकच्या गोण्यांचा वापर



वाढला आहे.

हजारो वर्षे विघटन न होणारा हा प्लास्टिक कचरा जमिनीची सुपीकता कमी करतो, जलस्रोत दूषित करतो आणि पर्यावरणाला अपूरणीय हानी पोहोचवतो. केवळ एक दिवस जागरूकता मोहीम राबवून हा प्रश्न सुटणार नाही. पर्यावरण संवर्धनासाठी वर्षातील प्रत्येक दिवस आणि दिवसातील प्रत्येक क्षणी जागरूक राहण्याची आवश्यकता आहे.

याशिवाय विकासाच्या नावाखाली होणारे अवैध डोंगर उत्खनन, माती, दगड आणि खनिजांचे बेसुमार उपसा, भूगर्भातील पाण्याचा अतिवापर आणि वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणीय समतोल अधिकच ढासळत आहे. परिणामी अवकाळी पाऊस, चक्रीवादळे, महापूर, भूकंप, उष्णतेच्या लाटा आणि इतर नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढताना दिसत आहे. याचा थेट परिणाम जनजीवनावर होत असून अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत.

पर्यावरणाच्या या ऱ्हासासाठी केवळ शासन किंवा प्रशासनालाच दोष देऊन चालणार नाही. अनियंत्रित प्लास्टिक वापर, कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि पर्यावरणाबाबतची उदासीनता यासाठी आपण सर्वच जबाबदार आहोत.

# अफगाणिस्तानविरुद्ध तिसऱ्या क्रमांकावर सुदर्शनला संधी?

**मुल्लनपूर : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात शनिवार (दि. ६) पासून मुल्लनपूर येथे होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यासाठी तिसऱ्या क्रमांकावर कोण खेळणार याबाबत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने महत्त्वाचे संकेत दिले आहेत. साई सुदर्शनला पुरेशा संधी मिळणे गरजेचे असून त्याच्यावरच विश्वास दाखवणार असल्याचे गंभीरने स्पष्ट केले आहे.



भारतीय संघ शनिवारपासून अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळणार आहे. आयपीएल २०२६ संपल्यानंतर अवघ्या सहा दिवसांतच कसोटी सामन्यासाठी संघ सज्ज झाला आहे. टी-२०मधून थेट कसोटीची मानसिकता तयार करणे हे खेळाडूंसमोर आव्हान आहे. याबाबत गौतम गंभीरने स्पष्ट केले की कसोटी सामने कणखर मानसिकतेची परीक्षा असतात. त्यामुळे कोणतीही सबब चालणार नाही. गेल्या काही वर्षांपासून भारतीय कसोटी संघाला तिसऱ्या क्रमांकावरील फलंदाजाची समस्या जाणवत आहे. या क्रमांकावर साई सुदर्शन, करुण नायर आणि वॉशिंग्टन सुंदर यांना संधी देण्यात आली होती. गेल्या वर्षी सुदर्शनला ६ सामन्यांत संधी मिळाली, मात्र २७.४५ च्या सरासरीने तो केवळ ३०२ धावा करू शकला. आता अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर कोण, याबाबत गंभीरने संकेत दिले.

संघात साई सुदर्शनसह देवदत्त पडिक्कलचा पर्याय असला तरी सुदर्शनलाच प्राधान्य दिले जाणार आहे. सुदर्शनने आयपीएल २०२६ मध्ये ७०० हून अधिक धावा करत जबरदस्त फॉर्म दाखवला आहे. गंभीर म्हणाला, "साई सुदर्शनला फारशा संधी मिळालेल्या नाहीत. तो इंग्लंडमध्ये बरंच खेळला आहे आणि मला वाटतं त्याला पुरेशा संधी मिळणं गरजेचं आहे. आम्ही संघात केवळ ११ खेळाडूंची निवड करू शकतो आणि साई वाईट फॉर्ममध्ये नाही. त्याने आयपीएलमध्ये ७०० हून अधिक धावा केल्यात.

जर ४-५ सामन्यांवरून आम्ही साईची पारख केली, तर आपण कधीही काहीतरी भक्कम उभारू शकणार नाही."देवदत्त पडिक्कलने आयपीएल २०२६ मध्ये ४००हून अधिक धावा केल्या व त्याआधी रणजी ट्रॉफीमध्ये ६ सामन्यांत ५४३ धावा केल्या, मात्र गंभीरच्या विधानावरून सुदर्शनलाच तिसऱ्या क्रमांकावर संधी मिळण्याची शक्यता अधिक आहे.

## सामन्यातील परिस्थितीचा आदर करा -गौतम गंभीर

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात न्यू चंदीगडमध्ये होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्याच्या २४ तास आधी हेड कोच गौतम गंभीरने पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्याला ऋषभ पंतला कसोटी संघाच्या व्हाईस कॅप्टन्सीवरून हटवण्याच्या निर्णयावर प्रश्न विचारण्यात आला. गंभीर म्हणाला, "आम्हाला ऋषभ पंतने स्वत:मध्ये बदल करावा असे वाटत नाही, परंतु आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये खेळाडूंनी सामन्यातील परिस्थितीचा आदर करणे अपेक्षित असते." एका वाक्यात उत्तर देऊन गंभीरने विषय संपवला, मात्र त्याच्या या विधानातून पंतला अप्रत्यक्षपणे टोला लगावल्याची चर्चा रंगली आहे.



ऋषभ पंतला उपकर्णधारपदावरून हटवून केएल राहुलकडे ही जबाबदारी देण्यात आली आहे. पंतच्या आक्रमक फलंदाजी शैलीवर याआधीही प्रश्न उपस्थित झाले आहेत. सामन्याच्या परिस्थितीनुसार खेळण्याची गरज असल्याचे संकेत गंभीरने दिले. दरम्यान, कसोटी सामन्यांसाठी अधिक चांगली तयारी करण्याची गरज असल्याचेही गंभीरने स्पष्ट केले.

## परदेशी लीग खेळल्यास पाच वर्षे टीम इंडियात नो एण्ट्री

### बीसीसीआयचा दणका

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ सध्या करारबद्ध असलेल्या खेळाडूंना कोणत्याही परदेशी टी-२० लीगमध्ये खेळण्याची परवानगी देत नाही, मात्र काही खेळाडू अकाली निवृत्ती घेऊन परदेशी लीगमध्ये खेळण्यासाठी जातात आणि तिथे संधी न मिळाल्यास पुन्हा भारतात परतण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी बीसीसीआयने मोठा निर्णय घेण्याची तयारी सुरू केली आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार परदेशातील लीगमध्ये खेळल्यानंतर भारतीय क्रिकेटमध्ये परत येऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंसाठी पाच वर्षांचा 'कूलिंग-ऑफ' कालावधी लागू करण्याचा प्रस्ताव बीसीसीआयसमोर आहे. या काळात खेळाडूला बीसीसीआयशी संबंधित कोणत्याही स्पर्धेत, देशांतर्गत क्रिकेटमध्ये किंवा आयपीएलमध्ये खेळता येणार नाही. अलीकडेच विजय शंकर याने भारतीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करून 'लंका प्रीमियर लीग' साठी स्वतःला उपलब्ध करून दिले. 'कँडी रॉयल्स'ने त्याला आगामी हंगामासाठी करारबद्ध केले आहे.

अशा घटनांमुळे बीसीसीआयला हा निर्णय घ्यावा लागत असल्याचे समजते. बीसीसीआयच्या मते खेळाडू केवळ पैशांसाठी परदेशी लीगला प्राधान्य देतात आणि भारतीय क्रिकेटला दुय्यम स्थान देतात. हा प्रकार रोखण्यासाठी आणि देशांतर्गत क्रिकेटचे महत्त्व आबाधित ठेवण्यासाठी पाच वर्षांचा बंदी कालावधी प्रभावी ठरेल, असे बोर्डाचे मत आहे.

## वैभव सूर्यवंशी टीम इंडियात पदार्पणाच्या उंबरठ्यावर

### इंग्लंड-आयर्लंड दौऱ्यासाठी निवडीची शक्यता



**मुंबई : प्रतिनिधी**

'बॉस बेबी' वैभव सूर्यवंशी लवकरच भारतीय संघात पदार्पण करण्याच्या तयारीत आहे. आयपीएल २०२६ मध्ये केलेल्या वादळी कामगिरीच्या बळावर त्याने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले आहे. केवळ १५ वर्षांचा असूनही त्याची खेळाची समज, बॅट स्विंग आणि मोठे फटके खेळत वेगाने धावा करण्याच्या क्षमतेने सर्वांनाच प्रभावित केले आहे. बीसीसीआय निवड समिती वैभवला थेट भारतीय टी-२० संघात संधी देण्याचा गंभीरपणे विचार करीत आहे.

आगामी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी त्याची संघात निवड करण्याची दाट शक्यता आहे. या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा शनिवारी होऊ शकते. याशिवाय रजत पाटीदारच्या नावाचीही चर्चा सुरू आहे. वृत्तानुसार सूर्यकुमार यादवला टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार करण्यात आले असून, गेल्या दोन वर्षांतील फॉर्म पाहता संघातील त्याचे स्थानही धोक्यात आले आहे. त्याच्या जागी रजत पाटीदारला संधी मिळू शकते. आयपीएल २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूला सलग दुसरे विजेतेपद मिळवून देण्यात पाटीदारचा मोलाचा वाटा होता.

### फ्रेंच टेनिस स्पर्धा

## आंद्रीवाची अंतिम फेरीत धडक; जेतेपदासाठी च्वालिन्स्काशी गाठ

**पॅरिस : वृत्तसंस्था**

माजी विजेत्यांसह आघाडीच्या मानांकित खेळाडूंचे आव्हान संपुष्टात आल्यानंतर फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत यंदा महिला एकेरीत आठवी मानांकित रशियाची मीरा आंद्रीवा आणि बिगरमानांकित पोलंडची माया च्वालिन्स्का यांच्यात अंतिम लढत रंगणार आहे. या दोघीही ग्रँडस्लॅम स्पर्धेत प्रथमच अंतिम फेरीत पोहचल्या आहेत.



आंद्रीवाने यंदाच्या हंगामातील सातत्य कायम ठेवताना गुरुवारी झालेल्या उपांत्य लढतीत १५व्या मानांकित युक्रेनच्या मार्ता कोस्च्युकचा ६-१, ६-३ असा अवघ्या ७६ मिनिटांत पराभव केला. दुसऱ्या उपांत्य लढतीत च्वालिन्स्काने डायना श्नायडरचे आव्हान ७-६ (७-४), ६-४ असे परतवून लावले. श्नायडरने उपांत्यपूर्व लढतीत अग्रमानांकित अरिना सबालेन्काला पराभवाचा धक्का दिला होता. फ्रेंच स्पर्धेत अंतिम फेरी गाठणारी १९ वर्षीय आंद्रीवा तिसरी युवा टेनिसपटू ठरली. रशिया-युक्रेन संघर्षाचे पडसाद उपांत्य लढतीवरही उमटले. कोस्च्युकने लढतीनंतर आंद्रीवाशी हस्तांदोलन करण्यास आणि तिच्यासह छायाचित्र काढण्यास नकार दिला.

फ्लाव्हिओ कोबोली आणि माटेओ अर्नाल्डी या इटलीच्या खेळाडूंमध्येच यंदाच्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेची उपांत्य लढत रंगणार आहे. त्यामुळे यानिक सिन्नेरच्या अपयशानंतरही इटलीचा एक खेळाडू अंतिम लढत खेळणार हे निश्चित आहे. पुरुष एकेरीतील दुसऱ्या उपांत्य लढतीत दुसरा मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि २६व्या क्रमांकाचा याकुब मेन्सिक समोरासमोर येतील .कोबोली आणि अर्नाल्डी या इटलीच्या दोन्ही खेळाडूंनी कारकीर्दीत प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. उपांत्यपूर्व फेरीत कोबोलीने फेलिक्स ऑगर-ॲलिसिमेचा ४-६, ६-४, ६-४, ६-४ असा पराभव केला. दुसरी उपांत्यपूर्व लढत माटेओ बेरेट्टिनी आणि अर्नाल्डी या इटलीच्याच खेळाडूंमध्ये झाली. बेरेट्टिनीने दुखापतीमुळे दुसऱ्या सेटमध्ये माघार घेतल्याने अर्नाल्डीला पुढे चाल मिळाली.

## WT-२० महिला लीग : मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते 'ठाणे स्कायरायझर्स'च्या जर्सीचे अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आणि खेळाडूंना हक्काचे व्यावसायिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या आगामी 'महिला टी-२० मुंबई लीग'साठी 'ठाणे स्कायरायझर्स' संघ सज्ज झाला आहे. नुकत्याच पार पडलेल्या एका विशेष समारंभात 'विमेन्स लीग' अंतर्गत ठाणे स्कायरायझर्सच्या अधिकृत जर्सीचे अनावरण प्रमुख अतिथी आणि मार्गदर्शक आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते अत्यंत दिमाखदार सोहळ्यात करण्यात आले.



वांद्रे-कुर्ला संकुल येथील मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर हा सोहळा पार पडला. याप्रसंगी संघाची कर्णधार सायमा ठाकोर हिच्यासह सर्व खेळाडू आणि प्रशिक्षक उपस्थित होते. ठाण्यातील पहिल्या महिला क्रिकेट संघाची घोषणा यानिमित्ताने करण्यात आली असून या दिमाखदार सोहळ्याची सुरुवात एका विशेष व्हिडीओ सादरीकरणाने झाली. या व्हिडीओमध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाचा प्रवास, खेळाडूंचा मैदानावरील संघर्ष आणि त्यांच्या ऐतिहासिक विजयाचे क्षण दाखवण्यात आले.

या प्रसंगी खेळाडूंना आणि आयोजकांना शुभेच्छा देताना आमदार प्रताप सरनाईक यांनी महिला क्रीडा क्षेत्रातील या उपक्रमाचे कौतुक केले."हा संघ केवळ ठाण्याचे प्रतिनिधित्व करणार नाही, तर महिला क्रिकेटमधील नव्या पर्वाची सुरुवात करेल. ठाण्यातील महिला खेळाडूंना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकण्याची मोठी संधी याद्वारे मिळेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा देण्यासाठी हा संघ कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

संघाची धुरा सांभाळणारी कर्णधार सायमा ठाकोर म्हणाली, "आमच्या संघात अनेक युवा आणि गुणवान खेळाडू आहेत, जे संघाला विजय मिळवून देण्यास सक्षम आहेत. या स्पर्धेसाठी आम्ही सर्वांनी प्रचंड मेहनत आणि पूर्वतयारी केली असून, मैदान गाजवण्यासाठी आमचा संघ आता पूर्णपणे सज्ज आहे." दरम्यान, ठाणे स्कायरायझर्स या संघाच्या पाठीशी खंबीर नेतृत्व आणि क्रीडाप्रेमी व्यवस्थापन सदैव उभे आहे.

## लॉर्ड्स कसोटीत गोलंदाजांचा कहर

### पहिल्याच दिवशी १६ विकेट्स

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना लॉर्ड्सच्या मैदानावर खेळवला जात आहे. लॉर्ड्स कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी गोलंदाजांचा दबदबा पाहायला मिळाला. पहिल्या दिवशी दोन्ही संघांच्या एकूण १६ विकेट्स पडल्या आणि फलंदाज धावा काढण्यासाठी अक्षरशः संघर्ष करताना दिसले. दरम्यान, काईल जेमिसनने पाच विकेट्स आणि ऑली रॉबिन्सनने तीन विकेट मेडन षटक टाकले.

न्यूझीलंडचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर असून पहिल्याच सामन्यात लॉर्ड्स खेळपट्टी दोन्ही संघांच्या फलंदाजांसाठी कर्दनकाळ ठरली. असमान उसळी असलेल्या खेळपट्टीवर पहिल्याच दिवशी तब्बल १६ विकेट्स पडल्या. ढगाळ वातावरणामुळे वेगवान गोलंदाजांना हवेत आणि खेळपट्टीवरूनही भरपूर मदत मिळत होती. त्यामुळे फलंदाजांसाठी मात्र मोठे आव्हान होते.



नाणेफेक जिंकून न्यूझीलंड क्रिकेट संघाने प्रथम गोलंदाजीचा योग्य निर्णय घेतला आणि त्यांच्या वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. सीमर्सना मिळालेल्या अनुकूल परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेत त्यांनी चेंडूने विकेट्सची रांग लावली आणि प्रतिस्पर्धी फलंदाजांना सतत अडचणीत टाकले. किवी संघाच्या चार वेगवान गोलंदाजांनी इंग्लंडच्या फलंदाजीला खिंडार पाडले. विशेषतः काईल जेमिसनने खेळपट्टीच्या अतिरिक्त उसळीचा आणि सीमचा पुरेपूर फायदा घेतला.

बेन डकेट (१९), जेकब बेथेल (६) आणि जो रूट (१) झटपट बाद झाले. त्यामुळे इंग्लंडची धावसंख्या ४ गडी बाद ३३ झाली. पावसामुळे डावात व्यत्यय आला आणि यादरम्यान न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीला पाठीच्या दुखापतीमुळे बाहेर पडावं लागलं, परंतु किवी गोलंदाजांनी आपलं वर्चस्व कायम ठेवलं. इंग्लंडकडून पुन्हा एकदा हॅरी ब्रुकने संघाचा डाव सावरला. ब्रुकने एका टोकाकडून विकेट्स पडत असताना आपली आक्रमक फलंदाजी कायम ठेवली. रचिन रवींद्र व डेव्हॉन कॉन्वे यांच्यामुळे ब्रुकला दोन वेळा जीवदान मिळाले. ब्रुकने १० चौकारांच्या मदतीने ५६ धावांची खेळी केली.

## एकाच खेळामुळे एकमेकांना मदत करणे सोपे -कृणाल पांड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ चे जेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सलग दुसऱ्यांदा जिंकले. १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर संघाने हे यश मिळवले. या विजयात कृणाल पांड्याने मोलाचा वाटा उचलला. दरम्यान, कृणाल आणि त्याचा भाऊ हार्दिक पांड्या यांच्यात दुरावा आल्याच्या चर्चा सुरू होत्या. यावर आता कृणालने पहिल्यांदाच भाष्य केले आहे. यंदाच्या मोसमात दोन्ही भावंडांचा एकत्र एकही व्हिडीओ समोर आला नाही. सामन्यानंतर एकमेकांना हस्तांदोलन करतानाही दोघे दिसले नाहीत. त्यामुळे दोघांमध्ये फूट पडली असल्याची चर्चा होती.



एका मुलाखतीत कृणाल म्हणाला, "आम्ही दोघेही एकत्र क्रिकेट खेळलो आहोत. त्यामुळे क्रिकेटमधील तांत्रिक आणि रणनीतिक बाबींवर आमच्यात कायम चर्चा होत असते. त्या चर्चा नेहमीच उपयुक्त आणि सकारात्मक असतात. आम्ही एकमेकांना अधिक चांगलं कसं बनवता येईल, याबाबत विचारांची देवाणघेवाण करतो. तुमचा भाऊही जर त्याच खेळाचा भाग असेल, तर एकमेकांना मदत करणं सोपं होतं आणि पांड्या कुटुंबात आता १० ट्रॉफी आहेत ही महत्त्वाची गोष्ट आहे." पांड्या बंधूंच्या नावे आयपीएलमध्ये प्रत्येकी ५-५ ट्रॉफी आहेत. हार्दिक मुंबई इंडियन्सच्या २०१५, २०१७, २०१९ आणि २०२० च्या विजेतेपद मोहिमेचा भाग होता. कृणालने २०१६ मध्ये मुंबईकडून पदार्पण केले आणि २०१७, २०१९, २०२० च्या विजयात भूमिका बजावली. २०२२ मध्ये हार्दिक गुजरात टायटन्सचा कर्णधार बनला आणि पहिल्याच हंगामात संघाला ट्रॉफी जिंकून दिली. कृणालने यंदा आरसीबीकडून खेळताना पाचवी ट्रॉफी जिंकली. २०२१ नंतर हार्दिक गुजरातमध्ये गेला आणि नंतर मुंबई इंडियन्सचा कर्णधार म्हणून परतला. मात्र त्याचे पुनरागमन चाहत्यांना फारसे भावले नाही. यंदा मुंबईला गुणतालिकेत तळाच्या क्रमांकांवर समाधान मानावे लागले. आता हार्दिककडून मुंबईचे कर्णधारपद काढून घेतले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पॉवर प्ले दोन भागांत हवा -सचिन तेंडुलकर

**मुंबई : प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या आयपीएलच्या सीझनमध्ये ट्रेंड दिसून आला की अनेक सामन्यांचा निकाल ७ ते १५ या ओव्हरमध्ये ठरला आहे. संघ आता पॉवर प्ले आणि डेथ ओव्हरची तयारी करताना दिसतात. त्यामुळे मला वाटते की पॉवर प्ले हा दोन भागांमध्ये वाटला गेला पाहिजे. पहिल्या चार ओव्हरमध्ये बॅटिंग पॉवर प्ले आणि इतर दोन ओव्हर या बॉलिंग पॉवर प्ले म्हणून वापरल्या गेल्या पाहिजेत. याचा वापर गोलंदाजी करणारा संघ कधीही त्यांना वाटेल तेव्हा करू शकतो. जर हे नियम टी-२० क्रिकेटमध्ये लागू केले तर तो एक अतिशय महत्त्वाचा असा टप्पा ठरू शकतो, असे मत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने व्यक्त केले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com